म. ग्रं. सं. ठाणें

विषय भा. व्याकरण

लेखक गंगाधर शास्त्री फडके

सन १८५०

ग्रंथालय क्रमांक ७८

पुस्तकाचें नांव महाराष्ट्र भाषेचे व्याकरण

गं. भा. ७७

# महाराष्ट्र भाषेचे व्याकरण

(भा. व्या.)

# A GRAMMAR

OF THE

# MARATHEE LANGUAGE

BY


GUNGADHUR SHASTREE PHUDKAY,

INSPECTOR;

AND INHABITANT OF NAGAON IN THE

USHTAGAR PRANT.


---

FOURTH EDITION,

THOROUGHLY REVISED AND ENLARGED.

---


BOMBAY:

PRINTED BY GUNPUT CRUSHNAJEE.

1850.

# महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.

गंगाधर शास्त्री फडके इन्स्पेक्टर
राहणार प्रांत अष्टागर
पेटा नागावें
निरूपण बोर्ड आफ् इड्युकेशन
याणीं सरकारी मराठी शाळांकरितां

पुनः सुधारून केलें

आवृत्ति चवथी


मुंबईंत

गणपत कृष्णाजी यांचा छापखान्यांत छापिलें

शक शालिवाहन १७७२ माहे भाद्रपद
इशवी सन १८५० माहे सपटेंबर.

# प्रस्तावना.

सन १८२४ पर्यंत महाराष्ट्र भाषेचें व्याकरण हा शब्द देखील नव्हता; असें असतां हा महाराष्ट्र देश जेव्हां कंपनी सर्काराचा ताब्यांत आला तेव्हां या देशांतील सर्वलोक विद्वान करावे या बुद्धीनें उदार सर्कारानें शाळा घालण्याचें काम चालविलें. त्यांत प्रथम मुंबईंत सन १८२२ सांत मराठी शाळा चालू केली, त्या शाळेचे सेक्रीतरी अज्जम मेहेर्बान कार्नेल जार्ज जारवीस साहेब झाले, त्याणीं या कारखान्यांत नवीन ग्रंथ इत्यादि कामें व्हावीं ह्मणून मजसुद्धां तीन पंडित ठेविले; आणि आज्ञा केली कीं, महाराष्ट्र भाषेचें व्याकरण करावें. त्याजवरून संस्कृत व्याकरणाध्ययन बलेंकरून एका वर्षांत व्याकरण तयार केलें; परंतु तें केवळ बरोबर झालें नाहीं, तथापि राहिल्ये विषयांस सूचक झालें. याच व्याकरणावरून सन १८२५ पासून सन १८३६ पर्यंत शिकविण्याचें काम चाललें. शेंकडों पंतोजी व हजारों मुलें या व्याकरणावरून त-

यार झाली. या व्याकरणाचा हातीं लिहिलेल्या प्रती बहुत झाल्या होत्या, तथापि प्रतींची अडचण पडूंलागली तेव्हां सर्व लहान थोरांचा मनांत आलें, कीं व्याकरण सुधारून छापेल तर बरें. त्याजवरून सुधारून छापण्या विषयीं ईश्वरें मला बुद्धि दिली. मग नित्यशः व्याकरण पढविण्याचा योगाने मूळचा व्याकरणांतील ग्राह्यांश किती व त्याज्यांश किती, व नवीन विषय कोणते पाहिजेत यांचा विचार करून गुरु शिष्य संवाद रूप व्याकरण तयार करून सन १८३६ सांत छापिलें. त्या प्रती समाप्त झाल्या नंतर मला नकळतां सन १८३८ सांत दुसरी आवृत्ति सर्कारानें छापिली; त्याही प्रती समाप्त झाल्यावरून तिसरी आवृत्ति छापण्याचा प्रसंग आला; तेव्हां लाघवार्थ गुरु शिष्य संवाद काढून नवीन जे व्याकरणांत अवश्य विषय पाहिजेत त्या सर्वांचा संग्रह करून हें व्याकरण सिद्ध केलें. याजवर सुमारें दहा महिनें श्रम केला आणि हा सर्व ग्रंथ वेदशास्त्र संपन्न महादेव शास्त्री कोल्हटकर तथा सखाराम शा-

स्त्री काळे तथा नारायण शास्त्री पुराणीक तथा राजश्री भिकाजी भास्कर शित्रे तथा विष्णु गंगाधर फडके यां सर्वांचा विचाराने ठरवून छापिला त्या प्रती समाप्त झाल्यावरून चौथी आवृत्ति छापिली आहे. कोणी ह्मणतील कीं, जी जांची जन्म भाषा त्यांस व्याकरणाचा काय उपयोग? त्यांचाही व्याकरणावांचून व्यवहार निर्वाह होतो. असें जे ह्मणणारे त्यांस उत्तर इतकेंच कीं, मातबरांचा प्रापंचिक व्यवहार चालतो तसाच दरिद्र्यांचाही भीकदूक मागून दिवस लोटतो. तसें व्याकरण जांस येतें त्यांचा वाग्व्यवहारांत आणि येत नाहीं त्यांचा वाग्व्यवहारांत बरोबरी नाहीं. हालीं जें महाराष्ट्र भाषेचें व्याकरण झालें आहे एणेकरून या भाषेचा अनुगम आणि भाषेंतील विषय समजण्याने संस्कृतांत प्रवेश करावयाची जांची इच्छा असेल त्यांस फार उपयोग घडेल. तो असा कीं, या भाषेंतील प्रकृति, प्रत्यय, विभक्ति, विभक्त्यर्थ, नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, पुरुष, सकर्मक, अकर्मक, भावीं, साधितशब्द, धातुसाधितशब्द, वर्तमानकाळ, भूतकाळ,

भविष्यकाळ, तीन लिंगें, विभक्ति, अव्ययें हे पदार्थ, अर्थ सुद्धां सलक्षण समजण्यांत आल्यावर संस्कृतादिक भाषा शिकण्यास केवढें साधन होईल पहा बरें! याकारितां महाराष्ट्रादि भाषांचीं व्याकरणे आवश्यक आहेत जाणून हा ग्रंथ सिद्ध केला आहे. या ग्रंथांत पुणेप्रांतींचे कोंकणस्थ व देशस्थ या लोकांची भाषा साधली आहे. यांतील गुणलेश असतील ते सज्जनानीं आदरावे.

## लाघवार्थ पारिभाषिक संज्ञा.

| | | |
|---|---|---|
| अ० | ह्मणजे | अनेकवचन. |
| इ० | ═══ | इत्यादि. |
| उ० | ═══ | उदाहरण व उत्तर. |
| ए० | ═══ | एकवचन. |
| पु० | ═══ | पुंल्लिंग. |
| स्त्री० | ═══ | स्त्रीलिंग. |
| न० | ═══ | नपुंसकलिंग. |
| प्र० | ═══ | प्रथम पुरुष व प्रयोग व प्रथमा जाणावी. |

| | | |
|---|---|---|
| द्वि० | = | द्वितीयपुरुष किंवा द्वितीयाविभक्ति. |
| तृ० | = | तृतीयपुरुष किंवा तृतीया विभक्ति. |
| च० | = | चतुर्थी. |
| पं० | = | पंचमी. |
| ष० | = | षष्ठी. |
| स० | = | सप्तमी. |
| वि० | = | विशेषण. |

# महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.

व्याकरण ह्मणजे अर्थाचा अनुसंधानाने शुद्ध बोलणे आणि लिहिणे या विषयांची विद्या आहे. व्याकरणाचे चार भाग आहेत, वर्णविचार, संधिविचार, शब्दसिद्धि आणि वाक्ययोजना.

## भाग १.

### वर्णविचार.

स्वर आणि व्यंजने असे दोन प्रकारचे वर्ण आहेत.

### स्वर.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ,

ए, ऐ, ओ, औ,*अं, अः हे सोळा आहेत; यांचे भेद ऱ्हस्व, दीर्घ आणि संधिस्वर असे तीन आहेत. अ, इ, उ, ऋ, ऌ, हे पांच ऱ्हस्व स्वर; आ, ई, ऊ, ॠ, ॡ, हे पांच दीर्घ स्वर; आणि ए, ऐ, ओ, औ, हे चार संधिस्वर आहेत.

वर सांगीतलेल्या स्वरांचे शुद्ध आणि अनुनासिक असे दोन भेद आहेत. केवळ मुखापासून ज्यांचा उच्चार होतो ते शुद्ध; जसें, अ, आ, ई, उ, ऋ, इ०. मुख आणि नासिका मिळून ज्यांचा उच्चार होतो ते अनुनासिक; जसें, अं, उं, एं, इ०. अक्षराचा वरचा बिंदूस अनुस्वार ह्मणावें आणि अक्षरापुढील दोन बिंदूस विसर्ग ह्मणावें. जसें, अं, अः कं, कः इत्यादि.

---

* अनुस्वार आणि विसर्ग यांचें परिगणन स्वरांमध्यें आहे त्यांचा उच्चार अ आ इत्यादि स्वरांचा आश्रया वांचून होत नाहीं, ह्मणून अं अः यांचें स्वरांत परिगणन करून सोळा स्वर मानिले आहेत.

## व्यंजनें.

क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, ज्ञ.

या व्यंजनांत क्ष आणि ज्ञ हीं दोन जोडाक्षरें आहेत तीं अशीं कीं, क आणि ष मिळून क्ष होतो; तसेंच ज आणि ञ मिळून ज्ञ होतो. याशिवाय या भाषेंत च, ज आणि झ अशीं तीन व्यंजनें आहेत.

सर्व व्यंजनांचा उच्चार स्वरावांचून क्, ख्, ग्, घ् इ॰ असा होतो, आणि स्वर मिळविल्याने क, ख, ग, घ, इ॰ असा होतो. जसें, क् आणि अ मिळून क; ख् आणि अ मिळून ख; असेंच पुढें जाणावें.

## वर्णांचा उच्चारांचीं स्थानें.

अ, आ, क, ख, ग, घ, ङ, ह आणि विसर्ग यांचें कंठस्थान; इ, ई, च, छ, ज, झ, ञ, य आणि श यांचें तालुस्थान; ऋ, ॠ, ट, ठ, ड, ढ, ण, र, ळ आणि ष यांचें मूर्धास्थान;

ऌ, ॡ, त, थ, द, ध, न, ल आणि स
दंतस्थान; उ, ऊ, प, फ, ब, भ आणि म
ओष्ठ स्थान; ञ, म, ङ, ण, न आणि अनुस्व
यांचें नासिका स्थान; ए आणि ऐ यांचें कंठ
स्थान; ओ आणि औ यांचें कंठोष्ठ स्थान; व
याचें दंतोष्ठ स्थान; आणि च, ज, आणि झ
यांचें दंततालु स्थान याप्रमाणे वर्णांचीं स्थानें
जाणावीं.

**जोडाक्षर** ह्मणजे दोन किंवा तीन इ० व्यंजनें आणि स्वर एकत्र मिळून जें अक्षर होतें तें; जसें प्र, क्र, त्र इत्यादि.

---

# भाग २.

## संधिविचार.

इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, एतदंत शब्दांपुढें स्वरादि शब्द किंवा प्रत्यय असतां इकार किंवा ईकार यांस व्यंजनरूप य्; उकार किंवा ऊकार यांस व्; आणि ऋकार किंवा ॠकार यांस र

निवर्तक होतो. उदाहरण दहीं आंबा अशी स्थिति असतां दहीं या शब्दाचा ईकार स्थानीं य् जाहला, य् आणि आंबा यांचा, दह् आणि यांबा द्ह्यांबा असा संधि होतो; याप्रमाणें दधि ओदन दध्योदन, अति अम्ल अत्यम्ल, अति आग्रह अत्याग्रह, अति उत्कृष्ट अत्युत्कृष्ट, गळूं आंत गळ्वांत लाडू आंत लाड्वांत, कर्तृ अर्थ कर्त्रर्थ, पितृ अर्थ पित्रर्थ इत्यादि संधि जाणावे.

एंकारांत आणि आकारांत शब्दांपुढें आंत शब्द असतां पूर्वशब्दाचा अंत्यास य् निवर्तक* होतो; उदाहरण, कडें आंत कड्यांत याप्रमाणे मडक्यांत, दांड्यांत इत्यादि संधि जाणावे.

अ, आ, एतदंत शब्दांपढें अ, आ, एतदादि शब्द असतां अंत्य अ, किंवा आ, आणि आदि अ, किंवा आ, मिळून एक दीर्घ आकार होतो; उ०, स्व अर्थ स्वार्थ, कानं आंत कानांत,

---

* निवर्तक ह्मणजे मूळचा अक्षराला मोडून त्या ठिकाणीं जो दुसरा होतो तो.

रुपया आंत रुपयांत, विद्या अर्थी विद्यार्थी, ढोल आगरी ढोलागरी, असेंच मिठागरी इत्यादि संधि जाणावे.

इ, ई, एतदंत शब्दांपुढें इ, ई, एतदादिशब्द असतां, अंत्य इकार किंवा ईकार आणि आदि इकार किंवा ईकार, मिळून एक दीर्घ ईकार होतो; उ०, संपत्ति इच्छु संपत्तीच्छु, पृथ्वी ईश पृथ्वीश इत्यादि.

उ, ऊ, एतदंत शब्दांपुढें उ, ऊ, एतदादि शब्द असतां अंत्य उ किंवा ऊ आणि आदि उ किंवा ऊ मिळून एक दीर्घ ऊकार होतो; उदाह० भानु उदय भानूदय, वर्षाभू उद्भव वर्षाभूद्भव.

लाड्वादि गणाहून भिन्न जे ईकारांत आणि ऊकारांत आणि ओकारांत शब्द, यां पुढें आंत शब्द असतां, आंत शब्दाचा आकारास पूर्वशब्दाचा अंत्याचें रूप होतें; उ० नदी आंत नदींत, गडू आंत गडूंत, तट्टू आंत तट्टूंत, बायको आंत बायकोंत असे संधि जाणावे.

अकारांत आणि आकारांत शब्दांपुढें इकारादि शब्द असतां पूर्व शब्दाचा अंत्य **अकार** किंवा **आकार** आणि उत्तर शब्दाचा आदि **इकार** मिळून **ए** होतो; उदाहरण **मेघ** आणि **ईश** यां पासून **मेघेश, परम ईश्वर परमेश्वर** असे संधि जाहाले. असेंच अकारांत आणि आकारांत शब्दांपुढें उकारादि शब्द असतां पूर्व शब्दाचा अंत्य **अकार** किंवा **आकार** आणि उत्तर शब्दाचा आदि **उकार** मिळून **ओ** होतो; उदाहरण **मेघ** आणि **उदक मेघोदक, गंगा** आणि **उदक गंगोदक** इ॰.

**मडक्यांत, तोंड्यांत,** हे अव्ययीभावसमास मानिले असतां **मडक्याचा आंत मडक्यांत** असा समास होईल, तेव्हां **मडक्याचा** यांतला चा जाऊन **मडक्या** राहिलें, त्याचा पुढें **आंत** शब्द आला असतां दोन शब्दांचे आकार मिळून एक दीर्घ आकार होतो; असेंच **तोंड्यांत** एथें ही जाणावें.

निषेधार्थक नचा पुढें उकारादि क्रियापदाचा योग असतां, नचा अकारास पाजो उकार त्याचें

रूप होतें; उ०, न उकले नुकले, न उघडे नुघडे असेंच नुरके, नुचले, नुजळे, नुमजे, इत्यादि संधि जाणावे.

अ, आ, एतदंत शब्दापुढें ए, ऐ एतदादि शब्द असतां पूर्वशब्दाचा आदि अकार किंवा आकार आणि उत्तर शब्दाचा आदि ए किंवा ऐ मिळून ऐ होतो; उ० पुंल्लिंग एकवचन पुंल्लिंगैकवचन, प्रथमा एकवचन प्रथमैकवचन, राज ऐश्वर्य राजैश्वर्य असेंच गुणैकत्व इ० संधि जाणावे.

अ, आ, एतदंत शब्दांपुढें ओ किंवा औ असतां अ किंवा आ आणि ओ किंवा औ मिळून औ होतो; उ० परम औषधी परमौषधी, परम औदार्य परमौदार्य इत्यादि.

हलसंधि प्रकरण ग्रंथविस्तार भयास्तव लिहिलें नाहीं.

# भाग

## शब्द सिद्धि विचार

शब्द ह्मणजे वाक्याचा अर्थवान् जो अवयव तो; जसें, **ईश्वरास पूजितो** यावाक्यांत **ईश्वरास** आणि **पूजितो** हे दोनही अवयव अर्थवान् आहेत. शब्दांचे भेद पांच आहेत; १ **नाम** २ **सर्वनाम** ३ **विशेषण** ४ **क्रियापद** आणि ५ **अव्यय**.

### नाम.

जा शब्दाने* जा पदार्थाचा बोध होतो तो शब्द त्या पदार्थाचें **नाम** होय; उदाहरण, **गोविंदा**, **पृथ्वी**, **पाणी** इत्यादि.

नामें **विशेष** आणि **सामान्य** अशीं दोन प्रकारचीं आहेत.

**विशेषनाम** ह्मणजे ठेविलेलें नाव किंवा परंप-

---

* एथें शब्द या शब्देंकरून विभक्ति योग्य सर्व प्रकारचें नाम, सर्वनाम आणि विशेषण इतके घेतले पाहिजेत.

रेने एकाच वस्तूचें जें नाम तें; उदाहरण **पांडू, रामा, परमेश्वर, आकाश** इत्यादि.

**सामान्यनाम** ह्मणजे जातिवाचक किंवा अधिकारादि निमित्ताने अनेक वाचक जें नाम तें; उदाहरण, **मनुष्य, पक्षी, घोडा, प्रधान, राजा, पाटील, कोंतवाल** इत्यादि.

**सिद्ध, साधित** आणि **समास** या प्रकारें नामाचे आणखी तीन भेद आहेत.

**सिद्धनाम** ह्मणजे जोशब्द बहुत दिवसांपासून जा पदार्थास बोधवितो तो शब्द त्या पदार्थाचें सिद्ध नाम, त्यास संस्कृतांत **रूढशब्द** ह्मणतात; उदा॰ **घोंडा, माती, झाड** इत्यादि.

**साधितनाम** ह्मणजे नामावरून प्रत्यय होऊन जें सिद्ध होतें तें; त्याचे भेद दोन आहेत, **शब्दसाधित** आणि **धातुसाधित** उ॰ **घोडेवाला** एथें **घोडा** शब्द आणि **वाला** प्रत्यय, **करणे** एथें **कर** धातु आणि **णे** प्रत्यय अशींच **पाटिलकी, करणारा** इत्यादि साधितनामें जाणावीं.

**समासनाम** ह्मणजे दोन किंवा तीन शब्द एकत्र

म.भा.३९



मिळून जें नाम होतें तें; उ० **राजवाडा** एथें **राजा** हा एक शब्द आणि **वाडा** दुसरा शब्द यांचा समास, **राजाचा जो वाडा तो राजवाडा** या प्रमाणें **गांवकुसूं, विद्यार्थी, सीतपित्तज्वर** इ० समास नामें जाणावीं.

नामाला **लिंगें, वचनें** आणि **विभक्ति** लागतात.

## लिंगें.

**पुल्लिंग, स्त्रीलिंग** आणि **नपुंसक** अशीं तीन लिंगें आहेत. पुरुष वाचक जीं नामें आणि जांचा मागें **तो** हा शब्द लागतो तीं पुल्लिंग नामें होत; उ० **तो गुरु, ईश्वर, गोपाळा** इ०. स्त्री वाचक जीं नामें आणि जांचा मागें **ती** हा शब्द लागतो तीं स्त्रीलिंगीं नामें जाणावीं; उ० **ती बायको, पोथी, विद्या, शाळा,** इ०. पुल्लिंग आणि स्त्रीलिंगावांचून जीं नामें आहेत आणि जांचा मागें **तें** असा शब्द लागतो तीं नपुंसक लिंगीं नामें जाणावीं उ० **तें घोडें, वांसरूं, तळें, मुलगें** इत्यादि.

**जो, जी, जें** आणि **हा, ही, हें** हे शब्द जेव्हां इतर शब्दांचा मागें लागतात तेव्हां तेही त्यांचा

पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसक लिंगांस बोधवितात. तीन लिंगी जे शब्द असतात त्यांचा स्त्री, पुरुष व्यक्तिनियम समजला नाहीं तोंपर्यंत त्यांचा व्यवहार नपुंसकत्वाने होतो; उ० घोडें, मनुष्य, गुरूं इत्यादि.

कित्येक पुल्लिंग नामांस ई आणि ईण प्रत्यय लागून स्त्रीलिंग नामें होतात.

| ई प्रत्ययांताचीं उदाहरणें. | | ईण प्रत्ययांताचीं उदाहरणें. | |
|---|---|---|---|
| पुल्लिंग. | स्त्रीलिंग. | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
| घोडा | घोडी | भट | भटीण |
| डोंगर | डोंगरी | भाट्या | भाटीण |
| लांडगा | लांडगी | हत्ती | हत्तीण |
| दोघे | दोघी | परभू | परभीण |
| जो | जी | सिंह | सिंहीण |
| खुंटा | खुंटी | कांसार | कांसारी० |
| पाणभऱ्या | पाणभरी | पक्षी | पक्षीण |
| भुत्या | भुती | स्वामी | स्वामीण |
| गवत्या | गवतीइ० | रामोशी | रामोशीणइ |

पुल्लिंग आणि स्त्रीलिंग नामें भिन्न जातीचे शब्द आहेत. उ० 

| पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|
| भाऊ | बहीण |
| मोर | लांडोर |
| बैल | गाय |
| बोकड | शेळी |
| नर | मादी |
| बोका | भाटी |
| विधुर | विधवा इत्यादि. |

कित्येक पुल्लिंग नामांस एं आणि रूं प्रत्यय लागून नपूंसक नामें होतात.

| एं प्रत्ययांताचीं उदाहरणें. | | रूं प्रत्ययांताचीं उदाहरणें. | |
|---|---|---|---|
| पुल्लिंग | नपुंसक. | पुल्लिंग | नपुंसक. |
| घोडा | घोडें | मेंढा | मेंढरूं |
| मुलगा | मुलगें | शिंगा | शिंगरूं |
| टोपला | टोपलें | लेंक | लेंकरूं |
| हा | हें | वाघ | वाघरूं |
| दोघे | दोघें | बकरा | बकरूं |

यांवांचून नपुंसक स्वतंत्र नामें बहुत आहेत.

## वचन.

**वचनें** दोन आहेत, **एकवचन** आणि **अनेकवचन**; पदार्थाचें एकत्व बोलायाचें असतां एक वचन होतें; आणि अनेकत्व बोलायाचें असतां अनेक वचन होतें. उदाहरण

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| राजा | राजे |
| बायको | बायका |
| तारूं | तारवें |
| खिडकी | खिडक्या इत्यादि. |

## विभक्ति.

**प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी षष्ठी, सप्तमी** आणि **संबोधन** अशा आहेत. यांचे बोधक प्रत्यय आणि अव्ययें सांगतो. प्रथमा विभक्तीला प्रत्यय नाहीं, शब्दाचें मूळचें जें रूप तीच प्रथमा, तिचा अनेक वचनीं मात्र कित्येकांचा रूपभेद होतो तो त्या त्या शब्दाचा अनेक वचनीं दाखविला जाईल.

| | एकवचनाचे प्रत्यय आणि अव्ययें. | अनेकवचनाचे प्रत्यय आणि अव्ययें. |
|---|---|---|
| द्वि० | स, ला, तें, प्रति. | स, ला, ना, तें, प्रति. |
| तृ० | ने, एं, शीं, सीं, वारीं कडून, करवीं, मुळें. | नीं, हीं, ईं, शीं, सीं, वारीं. |
| च० | स, ला, तें, करितां, कारणें, साठीं, अर्थ, अर्थीं, स्तव. | अनेक वचनीं असेंच जाणावें. |
| पं० | ऊन, हून, पासून, स्तव, कडून. | अनेकवचनीं एकवचन वत्. |
| ष० | चा, ची, चें. | अ० ए० वत्. |
| सं० | ईं, आंत, मध्यें, वर, ठायीं, विषयीं. | अनेकवचनीं एकवचन वत्. |

संबोधनाला प्रत्यय नाहींत, परंतु नामाचा मागें व पुढें अव्ययें लागतात तीं अशीं; पुल्लिंग आणि नपुंसक लिंगीं, रे, अरे, ए, अगा हीं एकवचनीं आणि अहो अनेकवचनीं, हीं नामाचा मागें लागतात; हो, नो हीं अनेकवचनीं पुढें लागतात. स्त्रीलिंगीं एकवचनीं अगे, अग, गे, ग, आणि

अनेकवचनीं अहो, अगा, हीं सर्व मागें लागतात. यांतून रे, गे, ग हीं पुढें हि कदाचित् लागतात.

जितके द्वितीयादि विभक्तींचे वर सांगितलेले जे स, ला इत्यादि एकाक्षरी त्यांस **प्रत्यय** ह्मणावें. यांवांचून द्व्यक्षरी त्र्यक्षरी इत्यादि राहिलीं तीं सर्व विभक्त्यर्थक अव्ययें आहेत असें जाणावें.

नामापुढें विभक्ति लागल्याने जे विशेष होतात ते.

एकाक्षर भिन्न अकारांत पुंल्लिंगास स्वर भिन्न द्वितीयादि विभक्ति पुढें असतां शब्दाचा अंत्यवर्ण दीर्घ होतो; आणि द्वितीयादि विभक्तींचा अनेकवचनीं शब्दाचा अंत्यवर्ण अनुनासिक होतो; आणि स्वरविभक्ति पुढें असतां अंत्याचा लोप होतो; आणि संबोधनीं एकानेक वचनीं अंत्यास दीर्घ होतो. या स्वरविभक्ति प्रायः अकारांतावांचून होत नाहींत.

## अकारांत पुंल्लिंग नामाला विभक्ति लागून रूपें होतात तीं.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| प्र० देव. | देव- |

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| द्वि० | देवास, देवाला, देवातें, देवाप्रति. | देवांस, देवांला, देवांनां, देवांतें, देवांप्रति. |
| तृ० | देवानें, देवें, देवाशीं, देवासीं. | देवांनीं, देवांहीं, देवीं देवांशीं, देवांसीं. |
| च० | देवाकरितां, देवाकारणें, देवासाठीं, देवार्थ, देवास्तव. | देवांकरितां, देवांकारणें, देवांसाठीं, देवांर्थीं, देवांस्तव. |
| पं० | देवाहून, देवापासून, देवास्तव. | देवांहून, देवांपासून, देवांस्तव. |
| ष० | देवाचा, देवाची, देवाचें. | देवांचा, देवांची, देवांचें. |
| स० | देवीं, देवांत, देवामध्यें, देवावर, देवाविषयीं. | देवीं, देवांत, देवांमध्यें, देवांवर, देवांविषयीं. |
| सं० | रे देवा, अरे देवा, ए देवा, अगा देवा, हे देवा, देवा रे. | अहो देवांनो, अहो देवा, देवानो हो, देव हो. |

अशींच ईश्वर, मनुष्य, पुरुष इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

जांचे उपांत्य* दीर्घ ई किंवा ऊ आहेत त्यांचा पुढें द्वितीयादि विभक्ति असतां उपांत्य दीर्घास ऱ्हस्वता होत्ये. आतां जर तो शब्द तीन अक्षरांचा असेल तर पक्षीं कित्येक शब्दांचा उपांत्यास अ निवर्तक होतो. उदाहरण.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० | चीक | चीक |
| द्वि० | चिकास | चिकांस इत्यादि. |
| प्र० | ऊंस | ऊंस |
| द्वि० | उंसास | उंसांस इत्यादि. |
| प्र० | उंदीर | उंदीर |
| द्वि० | उंदिरास, उंदरास | उंदिरांस, उंदरांस इ० |
| प्र० | बेडूक | बेडूक |
| द्वि० | बेडुकास, बेडकास | बेडुकांस, बेडकांस इ० |

* उपांत्य ह्मणजे शब्दाचा शेवटील अक्षराचा आलीकडील वर्ण होय.

वरचा अ निवर्तक नाइकादिगणास होत नाहीं. नाइकादिगण; **नाईक, पाईक, काशीद, जासूद** इत्यादि.

## संख्यावाचक नामांचीं रूपें.

एक शब्दास अनेकवचन नाहीं; उ० १ **एक, २ एकास, ३ एकाने, ४ एकाकारणे,** इत्यादि.

दोन, तीन इत्यादि शब्दांस एकवचन नाहीं, ते अनेक वचनांतच आहेत. दोन शब्दाचा नकारास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां **हों** निवर्तक होतो; उ०, १ **दोन, २ दोहींस, ३ दोहींनीं** इ०. तीन शब्दाचा नकारास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां **हीं** निवर्तक होतो; उदाहरण १ **तीन २ तिहींस ३ तिहींनी** इत्यादि. चार शब्दापुढें द्वितीयादि विभक्ति असतां, चार शब्दास **चोहों** निवर्तक होतो; उदाहरण. १ **चार, २ चोहींस ३ चोहींनीं** इ०. इतर संख्यावाचक अकारांतांचीं रूपें देव शब्दाचा अनेक वचन रूपांसारिखीं जाणावीं. आकारांत संख्या वाचकांचीं रूपें बाबा

काका, इत्यादि शब्दांचा अनेक वचन रूपांसारिखीं जाणावीं. संख्या वाचक शब्दांस प्रायशः संबोधन लागत नाहीं.

अ, क, ख, ग इ० एकाक्षर शब्दांस, विभक्ति पुढें असतां कांहीं विशेष होत नाहीं. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ अ | अ |
| २ अस, अला. | अस, अला, अनां |
| ३ अने, अशीं. | अनीं, अहीं, अशीं इ० |
| १ क | क |
| २ कस, कला. | कनां, कतें. |
| ३ कने, कशीं. | कनीं, कहीं, कशीं इ० |

अशींच अकारांत एकाक्षर सर्व शब्दांचीं रूपें जाणावीं.

## आकारांत पुंल्लिग नामांचे विशेष आणि रूपें.

आकारांत पुंल्लिग नामांचा अंत्यास प्रथमेचा अनेक वचनीं ए निवर्तक होतो, आणि द्वितीयादि

विभक्ति पुढें असतां अंत्यास या निवर्तक होतो; अनेकवचनीं अनुनासिक देव शब्दवत् होतो, हा सर्व विशेष बाबादि गणांतील शब्दांवांचून जाणावा उदाहरण.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ घोडा | घोडे |
| २ घोड्यास | घोड्यांस इत्यादि |

याप्रमाणें खोडा, दाटा इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

बाबा इत्यादि शब्दांचा गण बाबा, काका, तात्या, अण्णा, मामा, दादा इत्यादि.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ बाबा | बाबा |
| २ बाबास | बाबांस इत्यादि. |
| १ काका | काका |
| २ काकास | काकांस इत्यादि. |

याप्रमाणें मामा, अण्णा इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

जांचा अंत्य मूळचाच या आहे त्या शब्दांचा अंत्यास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां या निवर्तक करण्याची गरज नाहीं. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ रुपया | रुपये |
| २ रुपयास | रुपयांस इत्यादि. |

अशींच तोतया, पोपया, बापया, माणक्या, कांबळ्या, दोंद्या इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

जांचे उपांत्य च, ज, झ आणि स आहेत त्यांस द्वितीयादि विभक्ति पुढें असतां क्रमाने यथासंख्य च, ज, झ आणि श हे निवर्तक होतात.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ गांवचा | गांवचे |
| २ गांवचास | गांवचांस इत्यादि. |
| १ सांजा | सांजे |
| २ सांजास | सांजांस इत्यादि. |
| १ कोंझा | कोंझे |
| २ कोंझास | कोंझांस इत्यादि. |

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ मासा | मासे |
| २ माशास | माशांस इत्यादि. |

अशींच सांचा, माचा, आजा, पणजा, वांझा, वझा, वांसा इत्यादिकांचीं रूपें जाणावीं.

## इकारांत पुल्लिंग नामांचीं रूपें.

संस्कृत इकारांत पुल्लिंग नामाचा पुढें द्वितीयादि विभक्ति असतां अंत्यास दीर्घ होतो, वरकड सर्व विशेष देवशब्दवत् जाणावे. उदाहरण.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ हरि | हरि |
| २ हरीस | हरींस इत्यादि. |

याप्रमाणें रवि, कवि इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं. अशा शब्दांची प्रथमा प्रायः लोक दीर्घ ईकारांतच उच्चारितात; परंतु ते जसे असतील तसे ल्याहावे हें चांगलें आहे.

## ईकारांत पुल्लिंग नामांचीं रूपें.

प्राकृत ईकारांत शब्दांचा अंत्यास द्वितीयादि

विभक्ति पुढें असतां या निवर्तक होतो; अनेक वचनीं अनुनासिक देव शब्दवत् होतो. उ०,

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ धोबी | धोबीं |
| २ धोब्यास | धोब्यांस इत्यादि. |

अशींच नहावी, तेली, माळी इत्यादि शब्दांचीं रूपें आणावीं.

जांचे अंत्य दीर्घ ची आणि जी आहेत अशा नामांस द्वितीयादि विभक्ति पुढें असतां या निवर्तक होत नाहीं. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ मशालची, मशालजी | मशालची, मशालजी. |
| २ मशालचीस, मशालजीस. | मशालचीस, मशालजीस इत्यादि. |
| १ गाजी | गाजी |
| २ गाजीस | गाजीस इत्यादि. |

अशींच बाजी, पाजी, काजी, तासजी, देवजी, भटजी इत्यादिकांचीं रूपें आणावीं.

## उकारांत पुल्लिंग नामांचीं रूपें.

संस्कृत उकारांत पुल्लिंग शब्दांचा अंत्यास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां दीर्घ होतो; आणि अनेकवचनीं अनुनासिक देव शब्दवत् होतो. उ०,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ गुरु | गुरु |
| २ गुरूस | गुरूंस इत्यादि. |

याप्रमाणें भानु, केतु इ० शब्दांचीं रूपें जाणावीं. या भाषेंत प्रायः उकारांत शब्दांची प्रथमा दीर्घच उच्चारितात.

## ऊकारांत नामांचीं रूपें.

ऊकारांत नामांस सर्व विभक्ति पुढें असतां अनेकवचनीं अनुनासिक मात्र देव शब्दाप्रमाणें होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ पेरू | पेरू |
| २ पेरूस | पेरूंस इत्यादि. |

याप्रमाणें गेरू, मेरू, चाकू इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

लाडू इत्यादि शब्दांचा अंत्यास द्वितीयादि विभक्ति आणि संबोधनाचा नो पुढें असतां उवा आणि वा विकल्पें करून निवर्तक होतात. बंधु वाचक भाऊ शब्दाचा अंत्यास नित्यें वा निवर्तक होतो, त्यास पक्षीं द्वित्वही होतें. अनेकवचनीं अनुनासिक देव शब्दवत् जाणावा.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | लाडू | लाडू |
| २ | लाडूस, लाडुवास, लाड्वास. | लाडूंस, लाडुवांस, लाड्वांस. इत्यादि. |
| १ | भाऊ | भाऊ |
| २ | भावास, भाव्वास | भावांस भाव्वांस इ०. |

## ओकारांत पुल्लिंग नामांचीं रूपें.

ओकारांत नामाचा अंत्यास द्वितीयादि विभक्तींचा अनेकवचनीं अनुनासिक मात्र होतो. उ०

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | टाहो | टाहो |
| २ | टाहोस | टाहोंस इत्यादि. |

याप्रमाणें लाहो, गोहो इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

## अकारांत स्त्रीलिंग नामांचीं रूपें.

अकारांत स्त्रीलिंग नामांचे गण तीन आहेत. प्रथम - अडादि, दुसरा - आतादि, आणि तिसरा- आंधादि, यांचे विशेष.

अडादिकांचा अंत्यास प्रथमेचा अनेकवचनीं आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां ई निवर्तक होतो; अनुनासिक देव शब्दवत् होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ अड | अडी |
| २ अडीस | अडींस इत्यादि. |

याप्रमाणें ओढ, खोड, ओळ, कांब, कूस, खीळ इ० अडादि गणांतील नामांचीं रूपें जाणावीं.

## अकारांत स्त्रीलिंग आतादि गणांतील नामांचीं रूपें.

आतादिकांचा अंत्यास प्रथमादि विभक्तींचा

अनेक वचनीं आ निवर्तक होतो; आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां एक वचनीं ए होतो; अनुनासिक देवशब्दवत् जाणावा. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ आंत | आंता |
| २ आंतेस | आंतांस इत्यादि. |

या प्रमाणें चिंच, टांच, टींच, ठेंच इत्यादि आंतादि गणांतील नामांचीं रूपें जाणावीं.

## अकारांत स्त्रीलिंग आंचादि गणांतील नामांचीं रूपें.

आंचादि गणास वर लिहिलेल्या दोन गणांचींहि कार्यें विकल्पेंकरून होतात. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ आंच | आंचा, आंची |
| २ आंचीस, आंचेस | आंचांस, आंचींस इ०. |

याप्रमाणें कांच, खांच इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं. हे तीन गण म्हणजे शब्द समुदाय आहेत, जांचीं रूपें लोकांत अड शब्दा सारिखीं

होतात, तो अडादि गणांतील शब्द; असेंच दुसरे दोन गणांतील शब्दांविषयीं जाणावें.

जा नामांचे उपांत्य दीर्घ ईकार किंवा ऊकार आहेत, तेव्हां तीं जा गणांतील असतील तत्प्रयुक्त कार्यें होऊन, प्रथमेचा एक वचनावांचून सर्व विभक्ति पुढें असतां त्यांचे उपांत्य दीर्घ ई किंवा ऊ ऱ्हस्व होतात. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ ईट | इटा |
| २ इटेस | इटांस इत्यादि. |
| | |
| १ चूल | चुली |
| २ चुलीस | चुलींस इत्यादि. |

याप्रमाणें जीभ, चिंच, चूक, भूक इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

## स्त्रीलिंग ईणांत नामांचीं रूपें.

प्रथमेचा अनेक वचनीं, संबोधनीं आणि द्वितीयादि सर्व विभक्ति पुढें असतां ईणांत शब्दांचा उपांत्य ईकारास पक्षीं अ निवर्तक होतो; आणि

तो जेव्हां होत नाहीं, तेव्हां ईकारास ऱ्हस्वता होत्ये उदाहरण,

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | भटीण | भटिणी, भटणी |
| २ | भटिणीस, भटणीस | भटिणींस भटणींस |
| सं० | हे भटिणी, हे भटणी | अहो भटिणींनो, अहो भटणींनो |

याप्रमाणें सुतारीण, सोनारीण, कोल्हाटीण इ० नामांचीं रूपें जाणावीं. वरचा अ निवर्तक कुणबीण इ० गणास होत नाहीं. गण, कुणबीण परभीण, पंतीण, पंडितीण इत्यादि.

## आकारांत स्त्रीलिंग नामांची रूपें.

आकारांत स्त्रीलिंग नामांचा अंत्यास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां एक वचनीं ए होतो आणि अनुनासिक पूर्ववत् होतो. उदाहरण,

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | अगा | अगा |
| २ | अगेस | अगांस इत्यादि. |

या प्रमाणें **सुटका** **वाहवा** आणि संस्कृत **यमुना**, **नर्मदा**, **गंगा**, **त्रिज्या**, **ज्या** इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं. व्यक्तिवाचक **नर्मदा**, **गंगा** इत्यादि शब्दांचीं रूपें प्रथमेवांचून प्रायः देव शब्दाचा रूपांसारिखीं होतात.

## इकारांत स्त्रीलिंग नामांचीं रूपें.

इकारांत संस्कृत शब्दांचीं रूपें पुंल्लिग हरि शब्दाचा रूपांसारिखीं जाणावीं; **माती**, **खंती** इ० कित्येक प्राकृत ईकारांत शब्दांचीं रूपें न्हस्व इकारांतासारिखीं चालतात, परंतु यांचा प्रथमेचीं एकानेक वचनें दीर्घ असतात.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ गति | गति |
| २ गतींस | गतींस इत्यादि. |
| १ माती | माती |
| २ मातींस | मातींस इत्यादि. |

या प्रमाणें **खंती**, **शांति**, **वांति** इ० कित्येक शब्दांचीं रूपें जाणावीं.

# या वांचून राहिलेल्या ईकारांत स्त्रीलिंग नामांचीं रूपें.

प्राकृत ईकारांत स्त्रीलिंग शब्दांचा अंत्यास प्रथमाद्यनेकवचनीं **या** निवर्तक होतो, तो कित्येक संबंधि नामीं विकल्पें करून होतो; आणि संबोधनाचा एकवचनीं अंत्यास **ये** आणि अनेकवचनीं **या** निवर्तक होतो; अनुनासिक देव शब्दासारिखा होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ पोथी | पोथ्या |
| २ पोथीस | पोथ्यांस |
| सं० अग पोथ्ये | अहो पोथ्यानो इत्यादि. |
| १ चुलती | चुलत्या |
| २ चुलतीस | चुलत्यांस |
| सं० अग चुलत्ये | अहो चुलत्यानो इ० |

या प्रमाणें **मेथी, बाकी, लाडकी** इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

## संबंधि नामांचीं रूपें.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ मामी | मामी, माम्या |
| २ मामीस | मामींस माम्यांस |
| सं० अग मामी | अहो मामी, अहो माम्यानो इत्यादि. |

या प्रमाणें **काकी**, इ० नामांचीं रूपें जाणावीं.

**की**, **खी** इ० वर्णवाचक भिन्न एकाक्षरी स्त्री लिंग ईकारांत शब्दांचा प्रथमाद्यनेक वचनीं नामापुढें **या** होतो आणि द्वितीयादिकांचा एकवचनीं नामापुढें **ये** विकल्पें होतो तेव्हां, शब्दाचा दीर्घ ईकार प्रथमैक वचनावांचून सर्वत्र ऱ्हस्व होतो; अनुनासिक पूर्ववत् होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ स्त्री | स्त्रिया |
| २ स्त्रीस, स्त्रियेस | स्त्रियांस इत्यादि. |

याप्रमाणें **धी** इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

जा शब्दाचे अंत्य **ची**, **जी**, **झी** आणि **शी**

असे आहेत, त्यांचा अंत्यास प्रथमादिकांचा अनेकवचनीं आ निवर्तक होतो; आणि संबोधनीं एक वचनीं ए निवर्तक होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ भाची | भाचा |
| २ भाचीस | भाचांस |
| सं० अग भाचे | अहो भाचानो इ० |

या प्रमाणें पांची, सांजी, वांझी, काशी यांचीं रूपें जाणावीं.

## उकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें.

उकारांत शब्दांचा अंत्यास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां दीर्घ होतो; अनुनासिक देव शब्दवत् जाणावा. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ धेनु | धेनु |
| २ धेनूस | धेनूंस इत्यादि. |

या प्रमाणें चमु, इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

## ऊकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें.

ऊकारांत स्त्रीलिंग **गेरू** इ० शब्दांचीं रूपें पुंल्लिंग **पेरू** शब्दाप्रमाणें जाणावीं आणि प्राणिवाचक **गोदू**, **साळू** यांचीं प्रथमेचा एक वचनावांचून सर्व रूपें पक्षीं ईकारांत स्त्रीलिंग शब्दांचे रूपांसारिखीं जाणावीं. **सासू**, **ऊ** इ० कित्येक शब्दांस प्रथमादि विभक्तींचा अनेक वचनीं नामाचा अंत्यास **वा**, **उवा** विकल्पेंकरून निवर्तक होतात; आणि द्वितीयादिकांचा एकवचनीं नामाचा अंत्यास **वे**, **उवे** आणि संबोधनाचा अनेक वचनीं **वा**, **उवा** विकल्पेंकरून निवर्तक होतात.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | सासू | सास्वा, सासुवा |
| २ | सासूस, सासुवेस, सास्वेस. | सासुवांस, सासूंस, सास्वांस. |
| सं० | हेसासू, हेसास्वे, अगसासुवे. | अहो सासू, अहो सासुवानो, अहोसास्वानो इ०. |

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ ऊ | उवा, वा |
| २ { ऊस, उवेस, वेस. | उवांस, ऊंस, वांस. |
| सं० हेऊ, हेउवे हेवे | अहो उवानो, अहो वानो. |

ए, ऐ एतदंत शब्द स्त्रीलिंगीं नाहींत, परंतु वन्सें हा शब्द एंकारांत नित्यें अनेकवचनांत आहे, याचा प्रयोग स्त्रीलिंगीं आणि नपुंसक लिंगीं होतो; उ० स्त्री० वन्सें आल्या न० वन्सें आलीं याचीं रूपें असें, १ वन्सें २ वनसांस, वनसेंस, वनसेंनां, वनसांना ३ वनसांनीं, वनसेंनीं इ० अशीं होतात.

## ओंकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें.

ओकारांत शब्दांचा अंत्यास प्रथमादि विभक्तींचा अनेक वचनीं आ निवर्तक होतो, द्वितीयाद्यनेक वचनीं अनुनासिक देव शब्दवत् उ०,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ बायको | बायका |
| २ बायकोस | बायकांस इ०. |

दुसरा एक बायो शब्द आहे, त्याचें एकानेक वचन सारखें होतें. उ० १ बायो, २ बायोस, ३ बायोने, इत्यादि; याचें अनेकवचन बाया असें होत नाहीं; कारण तो बाया शब्द आकारांत स्वतंत्र आहे.

## अकारांत नपुंसक लिंग शब्दांचीं रूपें.

अकारांत नपुंसक लिंग शब्दांचा अंत्यास प्रथमेचा अनेक वचनीं एं निवर्तक होतो; दुसरे सर्व विशेष देव शब्दवत् जाणावे. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ ज्ञान | ज्ञानें |
| २ ज्ञानास | ज्ञानांस इत्यादि. |

याप्रमाणें घर, दार, कुंड, तोंड इ० नामांचीं रूपें जाणावीं.

आकारांत, इकारांत किंवा ईकारांत नपुंसक लिंगीं शब्द प्रायः नाहींत; ईकारांत आहेत, त्यांचे विशेष आणि रूपें.

ईकारांत शब्दांचा अंत्यास प्रथमेचा अनेकव चनीं पक्षीं यें निवर्तक होतो आणि द्वितीयादि वि भक्ति पुढें असतां अंत्यास या निवर्तक होतो अनुनासिक देव शब्दवत्.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ मोतीं | मोतीं, मोत्यें |
| २ मोत्यास | मोत्यांस इत्यादि. |

याप्रमाणे दहीं, मिरीं, पाणी, लोणी इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

## एकाक्षर ईकारांत नामांचे विशेष आणि रूपें.

एकाक्षर ईकारांत शब्दाचा अनेक वचनीं श ब्दाचा पुढें यें लागतो. आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां शब्दापुढें या लागतो, आणि अं वर्ण ऱ्हस्व होतो, अनुनासिक देव शब्दवत्. उ

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ वीं | वियें |
| २ वियास | वियांस इत्यादि. |

उकारांत किंवा ऊकारांत नपुंसक लिंगीं शब्द नाहींत, ऊंकारांत आहेत त्यांचे विशेष आणि रूपें.

हे शब्द प्राणि वाचक आणि अप्राणि वाचक अशा दोन प्रकारचे आहेत; प्राणिवाचकांचा अंत्यास प्रथमेचा अनेक वचनीं एं निवर्तक होतो, आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां देव शब्दाचा रूपां सारिखीं रूपें होतात; आणि अप्राणि वाचकांचा अंत्यास प्रथमेचा अनेक वचनीं अवें निवर्तक होतो; आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां अंत्यास अवा निवर्तक होतो; अनुनासिक देव शब्दवत् जाणावा.

## प्राणिवाचकांचीं रूपें.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ पांखरूं | पांखरें |
| २ पांखरास | पांखरांस इत्यादि. |

याप्रमाणे गुरूं, वांसरूं, मेंढरूं, कोंकरूं इत्यादि नामांचीं रूपें जाणावीं.

## अप्राणि वाचकांचीं रूपें.

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ तारूं | तारवें |
| २ तारवास | तारवांस इत्यादि. |

याप्रमाणें गळूं, अळूं इत्यादिकांचीं रूपें जाणावीं.

## एंकारांत नपुंसक लिंग शब्दांचे विशेष आणि रूपें.

एंकारांत शब्दांचा अंत्यास प्रथमेचा अनेकवचनीं ईं निवर्तक होतो; आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां अंत्यास या निवर्तक होतो, अनेकवचनीं अनुनासिक देव शब्दा प्रमाणें होतो. उ०,

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ तळें | तळीं |
| २ तळ्यास | तळ्यांस इत्यादि. |

याप्रमाणें वळें, करणें, चालणें, पोळें, चोळें इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

ज्यांचे अंत्य च, ज, झ आणि स आहेत

अशा एंकारांत नपुंसक शब्दांचा प्रथमेचा अनेक वचनीं आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां च, ज, झ, स यांस क्रमानें यथा संख्य च, ज, झ आणि श हे निवर्तक होतात. प्रथमेचा अनेक वचनीं अंत्यास ई निवर्तक होतो; आणि द्वितीयादि विभक्ति पुढें असतां अंत्यास आ निवर्तक होतो. ज्यांचा अंत्य सें आहे त्यांस प्रथमेचा अनेक वचनीं शीं विकल्पें निवर्तक होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ लोणचें | लोणचीं |
| २ लोणचास | लोणचांस इत्यादि. |
| | |
| १ खाजें | खाजीं |
| २ खाजास | खाजांस इत्यादि. |
| | |
| १ ओझें | ओझीं |
| २ ओझास | ओझांस इत्यादि. |

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ तवसें | तवशीं, तवसीं |
| २ तवशास | तवशांस इत्यादि. |

याप्रमाणे **उंचें, भजें, कारंजें, कोंझें, वांझें असें, तरें** इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

## सर्वनाम.

जे शब्द प्रसंगोपात्त नाम आणि विशेषण यांचा ठिकाणीं लाघवार्थ किंवा संकेतार्थ योजितात त्यांस **सर्वनाम** ह्मणावें. त्यांचे भेद पांच आहेत, **१ पुरुषसर्वनाम २ दर्शकसर्वनाम ३ प्रश्नार्थकसर्वनाम ४ संबंधिसर्वनाम** आणि **५ सामान्यसर्वनाम.**

जांचा योगानें क्रियापदाचे तीन पुरुष समजतात त्यांस **पुरुषसर्वनाम** ह्मणावें. उ०,

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० पु० | मी | आह्मी |
| द्वि० पु० | तूं | तुह्मी |
| तृ० पु० | तो, ती, तें | ते, त्या, तीं. |

प्रसंग विशेषीं जा शब्दांनी पदार्थ दाखविला जातो त्यांस **दर्शकसर्वनाम** ह्मणावें. उ०,

| एकवचन. | | अनेकवचन. |
|---|---|---|
| पु० | हा, तो | हे, ते |
| स्त्री० | ही, ती | ह्या, या, त्या |
| न० | हें, तें | हीं तीं. |

जा शब्दांनीं पदार्थ मात्राचा प्रश्न करितां येतो ते **प्रश्नार्थक सर्वनाम**; उदाहरण, **कोण, कोणता, काय** इत्यादि.

वाक्यामध्यें जे शब्द परस्परांशीं नित्य संबंध ठेवितात त्यांस **संबंधि सर्वनाम** ह्मणावें. उ०,

| एकवचन. | | अनेकवचन. |
|---|---|---|
| पु० | जो, तो | जे, ते |
| स्त्री० | जी, ती | जा, त्या |
| न० | जें, तें | जीं, तीं. |

जसें, **जो** आला **तो** गेला इत्यादि.

सामान्य रूपाने सर्व पदार्थांवर लागतात जे शब्द ते **सामान्य सर्वनाम**. उदाहरण, **सर्व, सगळा,**

अवघा, अमुक, फलाणा, भलता, आपण इत्यादि.

## मी आणि तूं यांचे विशेष आणि रूपें.

मी आणि तूं हे दोनही शब्द तीनलिंगी आहेत, यांचा प्रथमेचा अनेकवचनीं मी शब्दास **आह्मी** किंवा **अह्मी** आणि तूं शब्दास **तुह्मी** निवर्तक होतो. उदाहरण,

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| मी | आह्मी, अह्मी |
| तूं | तुह्मी. |

द्वितीयादि विभक्तींचा एकवचनीं मी यास **म** आणि तूं यास **तु** निवर्तक होतो. तें हा प्रत्यय पुढें असतां **मा** निवर्तक होतो, तूं शब्दास **तू** निवर्तक होतो; आणि द्वितीयेचे **ला- प्रति**; तृतीयेचा **शीं**, चतुर्थीचे **स** वांचून सर्व प्रत्यय; पंचमीचे- **हून-पासून** आणि सप्तमीचे सर्व प्रत्यय, हे पुढें असतां मी शब्दास **मज** आणि तूं शब्दास **तुज** निवर्तक

होतो, परंतु द्वितीया आणि चतुर्थीचा ला, तृतीयेचा- शीं, हे प्रत्यय पुढें असतां विकल्पें करून होतो; उदाहरण द्वि० ए० मातें, मला, मजला, मजप्रति; तूतें, तुला, तुजला, तुजप्रति. तृ० ए० मशीं, मजशीं; तुशीं, तुजशीं.

शींभिन्न तृतीयेचे सर्व प्रत्यय पुढें असतां विभक्ति विशिष्ट मी शब्दास म्या आणि तूं शब्दास त्वां विकल्पें करून निवर्तक होतो. उ०, तृ० ए० मी, म्या; तूं, त्वां. च० ए० मला, मजला, मजकारणें, मजसाठीं; तुला, तुजला, तुजकारणें, तुजसाठीं.

जेव्हां तृतीयेचा- शीं आणि चतुर्थीचे- करितां, कारणें, साठीं; आणि पासून, हून हे पंचमीचे प्रत्यय पुढें असतां मी शब्दास माझा आणि तूं शब्दास तुझा विकल्पें करून निवर्तक होतो; आणि तृतीयेचा- नें प्रत्यय पुढें असतां नित्यें होतो; उ०, तृ० ए० माझानें, माझाशीं; तुझानें, तुझाशीं; च० ए० माझाकरितां, माझाकारणें, माझासाठीं; तुझाकरितां, तुझाकारणें,

तुझासाठीं. पं० ए० माझापासून, माझाहून; तुझापासून, तुझाहून.

षष्ठी विभक्ति पुढें असतां विभक्ति विशिष्ट मी शब्दास पुल्लिंगीं माझा आणि तूं शब्दास तुझा; स्त्रीलिंगीं माझी, तुझी; नपुंसकलिंगीं माझें, तुझें हे निवर्तक होतात. उ० माझा, माझी, माझें; तुझा, तुझी, तुझें.

सप्तमीचा आंत प्रत्यय पुढें असतां मी शब्दास माझा आणि तूं शब्दास तुझा निवर्तक होतो; आणि ठायीं, मध्यें, वर हे प्रत्यय पुढें असतां विकल्पें निवर्तक होतो. उ०, माझांत, माझाठायीं, मजठायीं, माझामध्यें, मजमध्यें, माझावर, मजवर; तुझांत तुझाठायीं, तुजठायीं, तुझामध्यें, तुजमध्यें, तुझावर, तुजवर इत्यादि.

षष्ठीवांचून द्वितीयाद्यनेक वचनीं मी शब्दास आह्मा किंवा अह्मा आणि तूं शब्दास तुह्मा निवर्तक होतो. उ०, आह्मास, आह्माला,

आह्माप्रति, किंवा अह्मास, अह्माला, अह्माप्रति; तुह्मास, तुह्माला, तुह्माप्रति.

तृतीयेचा अनेक वचनीं मी शब्दास विभक्ति सुद्धां अह्मी किंवा आह्मी आणि तूं शब्दास तुह्मी निवर्तक होतो. उ०, अह्मी, आह्मी; तुह्मी.

चतुर्थीचे- कारणे- साठीं, पंचमीचे- पासून हून, सप्तमीचे- आंत- ठायीं- वर, हे प्रत्यय पुढें असतां, अनेक वचनीं मी शब्दास आह्मा आणि आमचा, तूं शब्दास तुह्मा आणि तुमचा विकल्पें निवर्तक होतात.

षष्ठीचा अनेक वचनीं मी शब्दास आम आणि तूं शब्दास तुम निवर्तक होतो. उ० तृ० आह्माशीं, आमचाशीं, आमचाने; तुह्माशीं, तुमचाशीं, तुमचाने. च० अ० आह्माकारणे, आमचाकारणे, आह्मासाठीं, आमचासाठीं; तुह्माकारणे, तुमचाकारणे, तुह्मासाठीं, तुमचासाठीं. पं० अ० आह्माहून, आमचाहून, आह्मापासून, आमचापासून; तुह्माहून; तुमचाहून, तुह्मापासून, तुमचापासून. प० अ०

आमचा, आमची, आमचें; तुमचा, तुमची, तुमचें. स० अ० अह्मांत, आह्मांत आमचांत, आह्मामध्यें, आमचामध्यें, आह्मावर, आमचावर, आह्माठायीं, आमचाठायीं, आह्माविषयीं, आमचाविषयीं; तुह्मांत, तुमचांत, तुह्मामध्यें, तुमचामध्यें, तुह्मावर, तुमचावर, तुह्माठायीं, तुमचाठायीं, तुह्माविषयीं, तुमचाविषयीं इत्यादि.

सर्वनामास संबोधन विभक्ति प्रायः बोलण्यांत येत नाहीं.

## मी शब्दाचीं रूपें.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० | मी | अह्मी, आह्मी. |
| द्वि० | मातें, मला, मजला, मजप्रति. | आह्मास, आह्माला, आह्मातें, आह्माप्रति. |
| तृ० | मी, म्या, माझाने, मजशीं, मशीं. | आह्मी, आमचाने, आमचाशीं. |

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| च० | मजकारणें, मजसाठीं, माझासाठीं. | आह्माकारणें, आह्मासाठीं, आमचासाठीं. |
| पं० | मजपासून, मजहून, माझापासून, माझाहून. | आमचापासून, आह्माहून. |
| ष० | माझा, माझी, माझें. | आमचा, आमची, आमचें. |
| स० | माझांत, माझामध्यें, मजमध्यें, माझावर, मजवर, माझाठायीं, मजठायीं, माझाविषयीं, मजविषयीं. | आमचांत, आह्मांत, आमचामध्यें, आह्मामध्यें, आमचावर आह्मावर, आमचाठायीं, आह्माठायीं, आमचाविषयीं, आह्माविषयीं. |

## तूं शब्दाचीं रूपें.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० | तूं. | तुह्मी. |

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| द्वि० | तूतें, तुला, तुज-ला, तुजप्रति. | तुह्मातें, तुह्माला, तुह्मा-प्रति. |
| तृ० | तूं, त्वां, तुझानें, तुझाशीं, तुजशीं. | तुह्मीं, तुमच्यानें, तुम-चाशीं. |
| च० | तुजकरितां, तुजका-रणें, तुजसाठीं, तुझा करितां-कारणे-साठीं. | तुमचाकरितां, तुह्माका-रणें, तुह्मासाठीं. |
| पं० | तुझापासून, तुज-हून, तुझाहून. | तुमचापासून, तुमचा-हून, तुह्माहून. |
| ष० | तुझा, तुझी, तुझें. | तुमचा, तुमची, तुम-चें. |
| स० | तुझांत, तुझामध्यें, तझावर, तुझाठा-यीं, तुझाविषयीं, तुजमध्यें- ठायीं-वर- विषयीं. | तुमचांत, तुमचामध्यें, तुमचावर, तुमचाठायीं, तुमचाविषयीं, तुह्मांत, तुह्मामध्यें, ठायीं- वर-विषयीं. |

## तो आणि हा या दोन शब्दांचे विशेष.

हे दोनहि शब्द तीनलिंगी आहेत, यांतील तो शब्दाचें पुल्लिंगी प्रथमैकवचन तो असेंच राहातें आणि या वांचून प्रथमेचीं एकानेकवचनें, पु० घोडा स्त्री० घोडी, न० घोडें या शब्दां सारिखीं होतात.

द्वितीयेचे- स- तें, तृतीयेचे- ने- नी- हीं, षष्ठी, सप्तमीचे- ठायीं- आंत यांवांचून सर्व विभक्तींचे प्रत्यय व अव्ययें पुढें असतां विभक्तिकार्य विशिष्ट हा आणि तो शब्द यांपुढें ज़ विकल्पें करून होतो.

द्वितीयेचा- प्रति, तृतीया, चतुर्थी, पंचमी, आणि सप्तमी यांचे प्रत्यय पुढें असतां ज चा ठिकाणीं च्या विकल्पें करून होतो.

स्त्रीलिंगी ही आणि ती या शब्दांपुढें ज आणि च्या पुल्लिंगाप्रमाणें होतात; ते झाले असतां शब्दांचा ईकार ऱ्हस्व होतो; तसाच ला- शीं आणि षष्ठी विभक्ति पुढें असतां ऱ्हस्व होतो.

तृतीयेचे- ने- नीं या प्रत्ययांस विकल्पें क्रमें- करून णे- णीं हे निवर्तक होतात.

हा शब्दास द्वितीयादि विभक्ति पुढें असतां पुं-नपुंसक लिंगीं विकल्पेंकरून या निवर्तक होतो; आणि स्त्रीलिंगीं ही शब्दास इ निवर्तक विकल्पें-करून होतो.

## * तो शब्दाचीं रूपें.

| | एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- | --- |
| प्र० | तो | ते |

---

* तो हा सर्व नाम शब्द तीन प्रकारानीं येतो कोठे संबंधि, कोठे दर्शक, कोठे पुरुष सर्व नाम. जेव्हा तो शब्द जो शब्दाशीं संबंध ठेवितो तेव्हां त्यास संबंधि सर्व नाम ह्मणावें. उदाहरण, जो मनुष्य पुण्याहून आला होता तो आज गेला, आजपर्यंत जो भला दिसत होता तो लुच्चा निपजला अंगुलि निर्देशाने दाखविण्याचा प्रसंगीं जेव्हां तो शब्द लेखांत येतो त्यास दर्शक सर्व नाम ह्मणावें. तो चंद्र उगवला तो घोडा धांवत आला इ. जेव्हां तृतीय पुरुषोद्देशें करून लेखांत तो शब्द येतो तेव्हां त्यास पुरुष सर्व नाम ह्मणावें उदाहरण, मी गवयाचा घरीं गेलों तो मला भेटला, मग त्याणें गायलें, मग आह्मी त्याची तारीफ केली, मग तो खुशी झाला इत्यादि.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| द्वि० | त्यास, त्याला, त्याजला, त्यातें, त्याप्रति. | त्यांस, त्यांला, त्यांजला, त्यांना, त्यांप्रति. |
| तृ० | त्यानें, त्याणें, त्याशीं, त्याचानें. | त्यांनीं, त्यांणीं, त्यांशीं, त्यांहीं, त्यांचानें. |
| च० | त्याकरितां, त्याचाकरितां, त्याकारणें, त्यासाठीं. | त्यांकरितां, त्यांचाकरितां, त्यांकारणें, त्यांसाठीं. |
| पं० | त्यापासून, त्याचापासून त्याहून, त्यास्तव. | त्यांपासून, त्यांचापासून त्यांहून, त्यांस्तव. |
| ष० | त्याचा, त्याची, त्याचें. | त्यांचा, त्यांची, त्यांचें. |
| स० | त्यांत, त्यामध्यें, त्याचामध्यें, त्याजमध्यें, त्याठायीं, त्यावर, त्याविषयीं. | त्यांत, त्यांमध्यें, त्यांचामध्यें, त्यांजमध्यें, त्यांवर, त्यांठायीं, त्यांविषयीं. |

## हा शब्दाचीं रूपें.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० | हा. | हे. |
| द्वि० | ह्यास, ह्याला, ह्यातें, यास, याला याजला. | ह्यांस, ह्यांना, ह्यांतें, यांस, यांला यांजला. |
| तृ० | ह्याने, याशीं, ह्याशीं, याचाशीं, याचाने. | यांनीं, यांहीं, ह्यांशीं, ह्यांहीं, ह्यांचाने. |
| च० | ह्याकरितां, याजकरितां, ह्याकारणें, ह्यासाठीं, याअर्थीं. | ह्यांकरितां, ह्यांकारणे, ह्यांसाठीं, ह्यांअर्थीं. |
| पं० | ह्यापासून, याहून, ह्यास्तव. | ह्यांपासून, यांहून, ह्यांस्तव. |
| ष० | याचा, ह्याचा, ह्याची, ह्याचें. | यांचा, ह्यांचा, ह्यांची, ह्यांचें. |

स० { याठायीं, ह्याठायीं, यांठायीं, ह्यांठायीं ह्यांम-
ह्यावर, ह्यामध्ये, ध्यें, ह्यांवर, ह्यांविषयीं,
ह्यांत, याविषयीं. यांत.

## जो शब्दाचे विशेष.

जो शब्दाचा प्रथमेचीं एकानेक वचनें तीन लिंगीं तो शब्दासारिखीं जाणावीं; द्वितीयादि विभक्ति पुढें असतां तो शब्दास जे विशेष तेच जो शब्दास जाणावे; परंतु तो शब्दाचा अंत्यास जसा **या** निवर्तक होतो तसा एथें **आ** निवर्तक होतो.

## कोण शब्दाचे विशेष आणि तीन लिंगीं रूपें.

कोण शब्दाचा प्रथमेचें एकानेक वचन सारखें होतें. द्वितीया आणि चतुर्थी पासून सप्तमी पर्यंत रूपें देव शब्दाचा रूपां सारिखीं होतात. तृतीया विभक्ति पुढें असतां विभक्ति विशिष्टास **कोणी** निवर्तक होतो, कित्येक लोकांत **कोणी**, **कोणास**

इ० यास्थळीं **कोण्ही, कोण्हास** असेंहि ह्मणत असतात. उदाहरण,

प्र० कोण; द्वि० कोणास, कोणाला कोणाप्रति; तृ० कोण्हीं, कोणीं; च० कोणाकरितां, कोणाकारणें, कोणासाठीं; पं० कोणापासून, कोणाहून; ष० कोणाचा, कोणाची, कोणाचें; स० कोणांत कोणामध्यें, कोणावर, कोणाठायीं, कोणाविषयीं.

## काय शब्दाचे विशेष.

काय शब्दाचीं प्रथमेचीं एकानेक वचनीं रूपें अकारांत पुल्लिंग शब्दासारिखीं होतात. उदाहरण, ए० व० **काय**, अ० व० **काय**. द्वितीयादि विभक्तींचीं सर्व रूपें प्रकारार्थक कसा शब्दासारिखीं आणावीं. प्रकारार्थक कसा शब्दाचीं प्रथमेवांचून रूपें प्रकारार्थीं भाषेंत प्रसिद्ध नाहींत.

## सामान्य सर्व नामांचे विशेष व रूपें.

आपण हा शब्द स्ववाचक आणि परवाचक होय. प्रथमा आणि तृतीया विभक्तींचीं रूपें एकानेक वचनीं सारखींच होतात. पण भिन्न विभ-

कींचीं रूपें देव शब्दाचा रूपांसारिखीं होतात; परंतु, णकारास ल्या निवर्तक होतो. षष्ठी विभक्ति पुढें असतां विभक्ति विशिष्टाचीं रूपें पु० आपला स्त्री० आपली, न० आपलें, अशीं होतात.

## आपण शब्दाचीं रूपें.

प्र० आपण, द्वि० आपणास, आपणाला, आपणातें, आपल्यातें, आपणाप्रति; तृ० आपण, आपणाशीं, आपल्याशीं; च० आपल्याकरितां, आपणाकरितां, आपणाकारणें, आपणासाठीं; पं० आपणाहून, आपल्यापासून, आपणास्तव; ष० आपला, आपली, आपलें, अ० व० आपले, आपल्या, आपलीं; स० आपणांत, आपणामध्यें, आपल्याठायीं, आपल्यावर, आपल्याविषयीं.

सर्व, या शब्दाचीं रूपें देव शब्दाचा अनेक वचना प्रमाणें होतात. आपला, भलता, फलाणा इत्यादि शब्दांचीं रूपें आकारांत पुल्लिंग, ईकारांत स्त्रीलिंग आणि एंकारांत नपुंसकलिंग शब्दांचा रूपां सारिखीं जाणावीं.

## विशेषण.

पदार्थांचे गुण किंवा इतर पदार्थांशीं भेद दाखविणारे जे शब्द त्यांस **विशेषण** ह्मणावें; उ०, **पांढरा, एक, दुसरा** इ०. विशेषणाचे भेद दोन आहेत; **गुणविशेषण** आणि **संख्यावाचक विशेषण.** गुण विशेषणाचीं उ०. **तांबडा, बरा, वाईट, साधु, भोंदू, विद्वान, शूर,** इ०. संख्यावाचक विशेषणाचे दोन भेद आहेत. पहिला भेद, **केवळ संख्यावाचक विशेषण** उ० **एक, दोन, तीन, चार, दोघे, तिघे, चौघे** इत्यादि. दुसरा भेद, **क्रमसंख्या वाचक विशेषण** उ० **पहिला, दुसरा, तिसरा, चौथा** इ०. पांच या संख्येपासून पुढील सर्व संख्यावाचकांस तीन लिंगीं **वा, वी, वें,** हे प्रत्यय लागून क्रमसंख्यावाचक विशेषणें होतात. उ० **पांचवा, सहावी, सातवें** इत्यादि.

एक दोन इत्यादि संख्येनें गुणित अशा अर्थीं सर्व केवल संख्यावाचक शब्दांवरून **पट** प्रत्यय होतो, तेव्हां दोन, तीन, चार, शब्दांस क्रमाने **दु,**

**ति, चौ** निवर्तक होऊन विशेषणें सिद्ध होतात; आणि **दु** आणि **ति** यांपुढील **पट** प्रत्ययाचा पकारास द्वित्व होतें. उ०, **दुप्पट, तिप्पट, चौपट** इ०. पांच, सहा इत्यादि सर्व संख्यावाचकांपुढें **पट** प्रत्यय लागला असतां विशेष होत नाहींत. उ० **पांचपट, सहापट** इत्यादि. जेव्हां दोन, तीन, चार हे प्राणि वाचकांचीं विशेषणे होतात, तेव्हां त्या शब्दांस **दोघे, तिघे, चौघे** तीनांलिंगीं अनेकवचनीं क्रमाने निवर्तक विकल्पें करून होऊन विशेषणें सिद्ध होतात. उ०, **दोन- दोघे** मुलगे; **तीन- तिघी** वाघिणी; **चार- चौघें** पोरें इत्यादि. तिघे, चौघे यांचा प्रयोग प्रायः प्राणिवाचकांमध्यें मनुष्यांवर फार होतो. दोघे इ० शब्दांचीं रूपें तीन लिंगीं क्रमें करून प्रथमा सोडून आकारांत पुल्लिंग, ईकारांत स्त्रीलिंग आणि प्रथमा सोडून अकारांत नपुंसक लिंग शब्दांचा अनेक वचन प्रमाणें होतात.

जा शब्दाचा मागें विशेषण लागतें त्या शब्दास **विशेष्य** ह्मणावें. विशेषणास विशेष्याचीं लिंगें वचनें आणि विभक्ति लागतात. विशेष्याचा अस-

न्निधानीं किंवा त्याची अनुवृत्ति* अथवा अध्याहार* असल्यास, विशेष्याचे सर्व धर्म विशेषणावर येतात. उ० **लुच्चाने** मला मारिलें, **शहाण्याचें** चाकर व्हावें पण **मूर्खाचा** धनी होऊं नये इ०.

विशेषणाचा मागें जीं विशेषणें लागतात तीं विशेषणाचीं विशेषणे होत. उ०, **अतिलहान; अत्यंतमोठा, फारचांगला** इत्यादि.

नामादिकांपुढें द्वितीयादि विभक्ति असतां नामादिकांचा मागें जीं विशेषणें किंवा सर्व नामें लागतात, त्यांचा मूळचा रूपांस विकार होतो, ह्मणून त्या रूपास **विकृतरूप** ह्मणावें. हा विकार जा सर्व नामांचीं किंवा विशेषणांचीं तीन लिंगीं रूपें फिरतात त्यांसच होतो. उ० **भल्या- भल्ये** मनुष्यास; **त्याचा- त्याचे** घरास; **त्या** पुरुषाने, **त्ये** पुरुषाने इ०. याप्रमाणें दोनहि प्रकारचा विकार या भाषतें सर्वांचा बोलण्यांत आहे; परंतु स्त्रीलिंगीं

---

* अनुवृत्ति ह्मणजे मागील संबंधानें जो शब्द येतो तो.

* अध्याहार ह्मणजे वाक्य परिपूरणार्थ शब्दांचीं मनांतील योजना.

भल्यें वायकोनें आणि पुल्लिंगीं भल्या मनुष्यानें, असेंच त्यें वायकोनें आणि त्या पुरुषानें असें संबोधनाचा सधानावरून बोलावें हें बरें दिसतें.

## समास.

समास ह्मणजे परस्परान्वयी भिन्नार्थक अनेक पदांमधल्या विभक्ति आणि विभक्तिकार्य यांचा लोपहोतो आणि क्वचित् पहिल्या शब्दाचा अंत्यवर्णास अ निवर्तक होऊन अनेक शब्दघटित एकार्थक एक शब्द होतो, त्यावरून विभक्ति होतात; उ० राजगृह, तांबडमाती इ०. समास बोधक जें वाक्य त्यास विग्रह ह्मणावें. जसें राजाचें जें गृह हें विग्रह वाक्यहोय. समास सात प्रकारचे आहेत; १ अव्ययीभाव २ तत्पुरुष ३ कर्मधारय ४ मध्यमपदलोपी ५ द्विगु ६ बहुव्रीहि आणि ७ द्वंद्व.

बहुव्रीहि भिन्न समासीं सर्वांस अंत्य पदाचें लिंग होतें.

## अव्ययी भाव.

हा समास पूर्वपदार्थ प्रधान होय; हा **चा, ची, चें,** प्रत्ययांत शब्दांशीं अव्ययें लागून प्रायः होतो. याचे **नित्य** आणि **अनित्य** असे दोन भेद आहेत.

**नित्यसमास** ह्मणजे समासांतील पदें सोडून बाहेरचा पदांशीं ज्याचा विग्रह असतो तो. उ० रूपास जें योग्य तें **अनुरूप,** शक्ति बाहेर नव्हे तें **यथाशक्ति;** या दोन उदाहरणीं क्रमानें **योग्य** आणि **बाहेरनव्हे** या बाहेरचा दोन पदांशीं विग्रह आहे.

**अनित्यसमास** ह्मणजे समासांतील पदांशीं ज्यांचा विग्रह होतो तो. उ० त्याचापुढें **त्यापुढें** त्याचामागें **त्यामागें,** त्याचापासून **त्यापासून,** याप्रमाणें **त्यावर, त्याप्रत, त्याकारणें, त्यासाठीं** इ० उदाहरणें जाणावीं.

प्रत, **कारणें, साठीं** इत्यादि विभक्त्यर्थक अव्ययांशीं जे समास होतात ते समास मानूं नये, तीं विभक्तिविशिष्ट शब्दरूपें मानावीं.

## तत्पुरुष.

हा समास उत्तर पदार्थ प्रधान होय. या समासीं प्रथमांतापासून सप्तम्यंतांचा प्रथमांतांशीं समास होतो. उदाहरण,

**प्रथमातत्पुरुष.** लांच खातो तो **लांचखाऊ** नवें शिकतो तो **नवशिका**, याप्रमाणें **आंगचुकाव**, **मारखाऊ** इ० उदाहरणे जाणावीं.

**द्वितीयातत्पुरुष.** देवातें भजणारा तो **देवभजक**, मोक्षाला इच्छिणारा तो **मोक्षेच्छु** इत्यादि.

**तृतीयातत्पुरुष.** गजानें मोजणी ती **गजमोजणी**, फांशानें पारध करणारा तो **फांसेपारधी**, पोटानें ह्मातारा तो **पोटह्मातारा**, वडिलानीं जें उपार्जित तें **वडिलोपार्जित** याप्रमाणें **मालमस्त** इ० उदाहरणें जाणावीं.

**चतुर्थीतत्पुरुष** घुसळायाकरितां जो खांब तो **घुसळखांब**, रणाकरितां जो खांब तो **रणखांब**; चोळीकरितां जो खण तो **चोळखण**, पोळी करितां जो पाट तो **पोळपाट**, इ०. चोळखण, पोळपाट इत्यादि उदाहरणीं मधील विभक्ति

जाऊन पहिल्या शब्दाचा अंत्यास अ निवर्तक होतो.

**पंचमीतत्पुरुष-** चोरापासून जें भय तें **चोरभय**, आचारापासून जो भ्रष्ट तो **आचारभ्रष्ट** इत्यादि.

**षष्ठीतत्पुरुष.** घराचा धनी तो **घरधनी** याप्रमाणे **राजवाडा, कामाठपुरा, देवघर, देवखोली ठकविद्या** इत्यादि उदाहरणें जाणावीं.

**सप्तमी तत्पुरुष-** आकाशाचा ठायीं वेल ती **आकाशवेल** अशींच **कामचुकार, रानडुकर, स्वर्गस्थ, गृहस्थ, वनगाय, अंतरवही, अंतरसाल** इ० उदाहरणें जाणावीं.

## नतत्पुरुष.

**नतत्पुरुष समास** ह्मणजे नचा प्रथमांताशीं समास होतो तो. व्यंजनादि संस्कृत किंवा प्राकृत शब्दांशीं नचा समास झाला असतां नस अ निवर्तक होतो. उ० नव्हे जो ज्ञ तो **अज्ञ**, नव्हे जो क्रोध तो **अक्रोध**, नव्हे जो वोला तो

अबोला, नव्हे जो बोल तो अबोल इ०. कित्येक ठिकाणीं या समासीं न दीर्घ होतो. उदाहरण नामर्द, नापीक इ०. स्वरादि शब्दांचा मागें न लागला असतां नस, अन निवर्तक होतो. उ०, अनर्थ, अनीश्वरवादी, अनभ्यास इ०. अशुद्ध बोलणारांचा भाषेंत हित शब्दाचा मागल्या नस अन निवर्तक होतो. उ० अनहित.

## कर्मधारय समास.

हा प्रथमांत विशेषणाचा प्रथमांत विशेष्याशीं समास होतो. याचे भेद- विशेषणपूर्वपद, विशेषणोभयपद, उपमानपूर्वपद, उपमानोत्तरपद आणि अवधारणापूर्वपद असे पांच आहेत.

विशेषणपूर्वपद - तोच होय जांत समासांतील पूर्व पद विशेषण असतें. उ०, कृष्ण असा जो सर्प तो कृष्णसर्प, नील असें जें कमल तें नीलकमल, काळें असें जें माजर तें. काळमाजर, तांबडी अशी जी माती ती तांबडमाती इ०.

यांत प्राकृत कित्येक उदाहरणीं विशेषणांत्यास अ निवर्तक होतो.

**विशेषणोभयपदकर्मधारय** - तोच होय जांत समासांतील दोनहि पदें विशेषण असतात. उ० पढलेला असा जो मूर्ख तो **पढतमूर्ख**, निमे गोरा तो **निमगोरा**, अर्धा शिजला तो **अर्धशिजा** या प्रमाणे **काळसांवळा, अर्धमेला** इ०, उदाहरणें आणावीं.

**उपमानपूर्वपदकर्मधारय** - तोच होय जांत पूर्व पद उपमान असतें. उ० मेघासारिखा जो श्याम तो **मेघःश्याम** याप्रमाणें **चंद्रमुख, चक्रवाढ** इ० उदाहरणें आणावीं.

**उपमानोत्तरपदकर्मधारय** - तोच होय जांत पूर्वपद उपमेय आणि उत्तर पद उपमान असतें. उ० मनुष्य सिंहासारिखा तो **मनुष्यसिंह**, पद कमलासारिखें तें **पदकमल**, या प्रमाणें **नेत्रकमल, हस्तकमल** इ० उदाहरणें आणावीं.

**अवधारणापूर्वपदकर्मधारय** - तोच होय जांत पूर्व पद निश्चयार्थक असतें. उ० विद्या

जी तेंच जें धन तें **विद्याधन**, मान जो तेंच जें धन तें **मानधन**. या प्रमाणें **यशोधन** इ० समास जाणावे.

**मध्यमपदलोपीसमास**• तोच होय जांत परस्परान्वयी तीन पदांचा समास होऊन मधलें पद जातें, आणि यांत उत्तर पद प्रधान असतें. उ० दह्यांने युक्त जो भात तो **दहींभात**, याच प्रमाणें **गुळांबा** इ० समास जाणावे.

**द्विगुसमास** - तोच होय जांत संख्यावाचक पूर्वपद असून समाहारार्थी एक विभक्तिक पूर्वोत्तर पदांचा समास होतो. उ० पांच पाळ्यांचा समाहार तें **पंचपाळें**, अशा समासीं पांच शब्द स्थानीं **पंच** किंवा **पंच** शब्दांचा प्रयोग होतो. उ० पांच आरत्यांचा जो समाहार ती **पंचारती** असेच **पंचखाजें, पंचमिसळ** इ० समास जाणावे.

अठरा अंकांपुढील प्रायः सर्व अंक द्विगु मध्यमपदलोपी समासांचा जातीचे आहेत. उ० **पंचवीस, पंचावन, पस्तीस** इत्यादि. यांचा अवय-

यांस विकार होतात, ते ग्रंथ विस्तार भयास्तव लिहिले नाहींत.

## बहुव्रीहि समास.

**बहुव्रीहि समास** अन्य पदार्थ प्रधान होय; याचे **समानाधिकरण, व्यधिकरण, संख्योभयपद, अंतराल लक्षण** आणि **व्यतिहार लक्षण** असे पांच भेद आहेत.

## समानाधिकरण.

**समानाधिकरण बहुव्रीहि समास** - तोच होय, जांत एक विभक्तिक दोन पदें असतात, याचे या भर्यंत पांच प्रकार आहेत. **तृतीयाबहुव्रीहि, चतुर्थीबहुव्रीहि, पंचमीबहुव्रीहि, षष्ठीबहुव्रीहि** आणि **सप्तमीबहुव्रीहि.**

**तृतीयाबहुव्रीहि.** कृत ह्मणजे केलें आहे कृत्य जें तें जेणें तो **कृतकृत्य**; असेच **संपादितविद्य** इ० समास जाणावे.

**चतुर्थीबहुव्रीहि.** दत्त ह्मणजे दिलें आहे धन जें तें ज्या कारणें तो **दत्तधन.** गुरु.

पंचमीबहुव्रीहि- गृहीत ह्मणजे घेतला आहे कर जो तो जा पासून तो गृहीतकर- लोके.

षष्ठीबहुव्रीहि- एक आहे गुरु जांचा ते एक गुरुक- शिष्य.

सप्तमीबहुव्रीहि- बहुत आहेत रंग जे ते जाचाठायीं तो बहुरंगी- पट; या प्रमाणें सुंदर- वृक्ष- वन, सुंदरचित्र- गृह इत्यादि समास आणावे.

## षष्ठीबहुव्रीहीचे भेद.

विशेषणपूर्वपदबहुव्रीहि- नील आहे कंठ ओतो जाचा तो नीलकंठ; या प्रमाणे वृहत्शरीर इ० उदाहरणें आणावीं.

विशेषणोत्तरपद- ओंठ तुटला जाचा तो ओंठतुट्या, याप्रमाणें शिंगमोड्या, कांठफुटका इ० उदाहरणें आणावीं.

उपमानपूर्वपद- कमलासारिखे आहेत नेत्र जे ते जाचे तो कमलनेत्र, याप्रमाणें पद्महस्त इ० उदाहरणें आणावीं.

**अवधारणापूर्वपद** - यश जें तेंच आहे धन जें तें ज्याचें तो **यशोधन** अशींच **मानधन**, **विद्याधन** इ० उदाहरणें जाणावीं.

**मध्यमपदलोपी बहुव्रीहि**- घोड्याचा मुखा-सारिखें आहे मुख जें तें ज्याचें तो **घोडमुख्या**, मृगाचा अक्षिसारिखीं आहेत अक्षि जीं तीं जी चीं ती **मृगाक्षी**, नाहीं विद्यमान पुत्र जो तो ज्याचा तो **अपुत्र**. एथें कित्येक उदाहरणीं षष्ठी प्रमाणें **स**, **ला**, **कारणें**, **प्रति** हे हि प्रत्यय होतात.

**नबहुव्रीहि**- नाहीं विद्या ज्यास तो **अविद्य** या प्रमाणें **अशक्त** इ० उदाहरणें जाणावीं.

## व्यधिकरण बहुव्रीहि.

**व्यधिकरणबहुव्रीहि** तोच होय ज्यांतील पदें भिन्न विभक्तिक असतात. उ० ;मनुष्या पासून आहे जन्म ज्याचें तो **मनुष्यजन्मा**, चक्र आहे पाणीचा ठायीं ज्याचा तो **चक्रपाणि** इत्यादि.

## संख्योभयपद.

यांत दोन्ही पदें संख्यावाचक असतात; दोन तीन ते **दोनतीन**, चार पांच ते **चारपाच**, या प्रमाणें **सत्राअठरा, पंचवीससव्वीस** इ॰ उदाहरणें आणावीं.

## अंतराललक्षण.

यांत दोहों दिशांचें अंतर दर्शविलें असतें उ॰, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत जी लांबी ती **पूर्वपश्चिम**, या प्रमाणें **दक्षिणोत्तर** इत्यादि उदाहरणें आणावीं.

## व्यतिहारलक्षण.

यांत परस्पर युद्धक्रिया दर्शविली असत्ये. उ॰ परस्पर पायपोस घेऊन जी लढाई ती **पायपोसापायपोशी** या प्रमाणें **ह्राणामारी, बोलाचाली, बुकलाबुकली**, इ॰ उदाहरणें आणावीं.

## सहपूर्वपद.

यांत साहित्यार्थक **स** आणि **सह** हीं पूर्व पद असतात. उ॰, शिष्या सहवर्तमान तो **सशिष्य**

गुरु, पुत्रासह तो **सहपुत्र** पिता, व्याजानें सहित ते **सव्याज** इत्यादि.

## सहोत्तरपद.

यांत साहित्यार्थक **सहित** आणि **सहवर्तमान** हीं दोन पदें उत्तर असतात. उ०, पत्नीशीं सहित तो **पत्नीसहित**, सेनेशीं सहवर्तमान तो **सेनासहवर्तमान** इत्यादि.

## द्वंद्वसमास.

हा उभय पदार्थ प्रधान होय, याचे भेद **परस्परयोगद्वंद्व** आणि **समाहारद्वंद्व** असे दोन आहेत.

**परस्परयोगद्वंद्व** तोच होय जांत परस्परांचा योग या अर्थी अनेक प्रथमांतांचा समास होतो, आणि तें समासांत पद अनेकवचनांत असतें. उ० बहीण आणि भावंड तीं **बहीणभावंडें**, माय आणि लेंकरूं तीं **मायलेंकरें** इत्यादि.

**समाहारद्वंद्व** तोच होय जांत समाहारार्थी अनेक प्रथमांतांचा समास होतो आणि तें समासां-

तपद एकवचनांत असतें. उ० शेला आणि पागोटें यांचा जो समाहार तें **शेलापागोटें**, याचरीतीनें **ढालतरवार** इत्यादि समास जाणावे.

आलीकडे या भाषेंत कित्येक प्रवीण जाहले आहेत, त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, प्राकृत आणि संस्कृत शब्दांचा समास करूंनये; परंतु मागेंपासून अशा समासांची प्रवृत्ति भाषेंत फार चालत आली आहे; त्यांचीं कित्येक उदाहरणें, **वडिलोपार्जित, देवघर, देवखोली, देवपाट, संध्यापळी, राजवाडा, राजभांड, चक्रवाढव्याज, सव्याज** आणि रामस्त्री **नामकाना** त्यजुनि उरतें पाडितें फार तेव्हां, या श्लोकाचा चरणांत **नामकाना** या स्थळीं, नाम्नः ह्मणजे नामाचा जो काना तो **नामकाना** इ०. यवनी आणि संस्कृताचे हि समास प्रसिद्ध आहेत. उ०, **लोदीवंश, गोरीवंश, याहुदीवंश** आणि ब्रह्मणातुलितावेतौ **अकब्बरपुरंदरौ** इ०. अशा प्रकारचे समास भाषेंत बहुत आहेत ह्मणून **आतादि,**

आंचादि, अडादि, असे समास सोईकरितां केले आहेत.

## शब्दसाधित नामादि विचार.

अनेक शब्दांवरून अर्थ विशेषीं अथवा स्वार्थी अनेक प्रत्यय होऊन शब्द साधित बहुत शब्द सिद्ध होतात. त्या सर्वांचें अनुगमपूर्वक सांगणें अवघड, याजकरितां त्यांची रीति समजावयासाठीं कित्येक उदाहरणें सांगतों. हा, जो, तो, कोण, भलता, या शब्दांवरून प्रमाणार्थीं आणि स्वार्थीं वढा आणि तका हे दोन प्रत्यय होतात. आतां वढा प्रत्यय पुढें असतां हा, जो, तो, कोण, भलता, या शब्दांस क्रमेंकरून ए, जे, ते, के, भलते हे निवर्तक होतात; आणि तका प्रत्यय; पुढें असतां त्याच शब्दांस क्रमानें इ, जि, ति कि, भलति हे निवर्तक होतात. उ०, हें आहे प्रमाण जाचें तो एवढा, अशींच जेवढा, तेवढा, केवढा इ० उदाहरणें जाणावीं. तका प्रत्ययाचीं उदाहरणें, हें आहे प्रमाण जाचें तो इतका,

अशींच जितका, तितका, कितका, भलतितका हीं उदाहरणें आणावीं. स्वार्थीं उ० जेवढा पहावा तेवढा शहाणा, जितका पहावा तितका सुज्ञ इत्यादि.

हा, जो, तो, कोण, भलता, या शब्दांवरून प्रकारार्थीं सा प्रत्यय होतो. आणि याशब्दांस क्रमेंकरून अ, ज, त, क, भलत, हे निवर्तक होतात. उ० असा, जसा, इ०. याच अर्थीं सला, शेला, हे प्रत्यय याच शब्दांवरून होतात; निवर्तक पूर्ववत् उ० असला, अशेला इत्यादि.

क्रियेची उत्पत्ति जा संख्येनें गणिजेत्ये त्या संख्या वाचकांवरून आणि ति, तिक, तका, या प्रत्ययांतांवरून दां आणि वार प्रत्यय पर्यायाने होतात. उ० एकदां, दोनदां, शंभरदां, कितिएकदां, जितकेदां, इ० एकवार, पांचवार, इत्यादि.

काल देश वाचक अव्ययांवरून क्वचित् अधिकरणार्थीं, क्वचित् संबंध्यर्थीं चा प्रत्यय होतो आणि देशवाचकांवरून त्याच अर्थीं ला प्रत्यय

होतो. उ० आजचा, एथचा, एथला, संध्याकाळचा, सकाळचा इत्यादि.

तत्संबंधि अथवा तें आहे जांत असा अर्थ विवक्षित असतां सर्व शब्दांवरून चा होतो तो षष्ठी सारिखीं वचन विभक्ति यांचीं कार्यें करितो; उ० देवाचा- पुजारी, किमतीचा- मनुष्य इ०. हीं चांत सर्व विशेषणें होतात.

तदुपयोगी असा अर्थ विवक्षित असतां कित्येक शब्दांवरून चा होतो. उ० पोळ्यांचा- तवा, कामाचा- माणूस इत्यादि.

तृतीयार्थक नेचा अर्थीं चा होतो. उदाहरण जातीचा- ब्राह्मण, नावाचा- जोशी इत्यादि.

कित्येक शब्दांवरून स्वार्थीं चा होतो. उ० तुमचाने, आमचाने, इ०. या चास क्वचित् द्वित्व होतें. उ० त्याचाचाने, याचाचाने इत्यादि.

तें आहे जांत अथवा जास अशा अर्थीं आवादिकांवरून दार प्रत्यय होतो, तो पुढें असतां आकारांत शब्दाचा अंत्य आकारास अ निवर्तक होतो;

उ० आवदार इ०- क्वचित् ए होतो; उ० मामलेदार, सुभेदार इत्यादि.

तें आहे जास याअर्थी घरादि शब्दांवरून करी प्रत्यय होतो; उ० घरकरी, शेतकरी इत्यादि.

तें आहे जांत किंवा जास या अर्थी तद्वाचक शब्दांवरून वार प्रत्यय होतो. उ० उमेदवार, सरिफेवार इत्यादि.

तें आहे जास या अर्थी विभागादि शब्दांवरून ई, प्रत्यय होतो. उ० विभागी, योगी इत्यादि.

तें आहे जास या अर्थी पालखी इत्यादि शब्दांवरून वाला प्रत्यय होतो. उ० पालखीवाला, अब्दागीरवाला इत्यादि. याच रीतीनें वान् वंत हे पुत्रादि शब्दांवरून होतात.

तीं आहे उपजीविका या अर्थी जी, ची हे प्रत्यय होतात; उ० मशालजी, मशालची. अशा रीतीनें सिद्ध शब्दांवरून सहस्रावधि प्रत्यय होऊन हजारों साधित शब्द होतात. त्यांचीं कित्येक उदाहरणें.

| शब्द. | प्रत्यय. | सिद्धरूपें. |
| --- | --- | --- |
| पाटील | की | पाटीलकी. |
| गुलाम | गिरी | गुलामगिरी. |
| सोदा | शाई | सोदेशाई. |
| चांगला | पण | चांगलेपण. |
| वाईट | पणा | वाईटपणा. |
| धीट | आई | धिटाई. |
| थंड | ई | थंडी. |
| कोंकण | ई | कोंकणी. |
| आंत | ईल | आंतील. |
| तेल | कट | तेलकट. |
| बोल | का, की, कें | बोलका- की- कें. |
| चहाड | खोर | चहाडखोर. |
| खोल | गट | खोलगट. |
| गुळ | चट | गुळचट. |
| एक | पट | एकपट. |
| रान | वट | रानवट. |

असे बहुत प्रत्यय होऊन बहुत शब्द होतात ते अशा रीतीने जाणावे.

## द्वित्वप्रकरण.

प्रति पदार्थीं असा अर्थ विवक्षित असतां घरादि शब्दांस द्वित्व होतें, तें झालें असतां प्रथम शब्दाचा अंत्यास ओ किंवा पक्षीं आन् निवर्तक होतो; उ० घरोघर, दारोदार, घरान्घर, गांवान्गांव फिरलों इत्यादि.

केवळ बरोबर या अर्थीं कित्येक शब्दांस द्वित्व होतें, तेव्हां पहिल्या शब्दाचा अंत्यास ओ निवर्तक होतो; उ० कांठोकांठ, धारोधार, भारंभार, तंतोतंत, कांतोकांत, भारोंभार, टंकोटंक इत्यादि.

सन्निध, मागाहून याअर्थीं पाठ इत्यादि शब्दांस द्वित्व होऊन पूर्व शब्दाचा अंत्यास ओ निवर्तक होतो; उ० पाठोपाठ, मागोमाग इत्यादि.

अशीं अनेकार्थीं अनेक शब्दांस द्वित्वें होऊन पूर्व शब्दांचा अंत्यास ओ इत्यादि रूप निवर्तक होतात.

पूर्वार्धं समाप्तिमगमत्.

# अथोत्तरार्ध प्रारंभः

## क्रियापदविचार.

**क्रियापद** ह्मणजे धातूस प्रत्यय लागून जें रूप सिद्ध होतें तें. व्यापार किंवा स्थिति अशा अर्थाचे जे **ऊठ, कर** इत्यादि शब्द ते **धातु** होत; हे तीन प्रकारचे आहेत १ **सिद्धधातु** २ **नामधातु** आणि ३ **अनुकरणधातु. कर, बोल** इत्यादि हे सिद्धधातु. नामधातु ह्मणजे नामावरून सिद्ध होतात ते; जसें **आळस, बळाव** हे धातु **आळस, बळ** या नामांवरून झाले आहेत. अनुकरणशब्दांवरून अनुकरण धातु होतात; जसें **खणखणणे, दणदणणे** हे धातु **खणखण, दणदण** या अनुकरण शब्दांवरून झाले आहेत.

धातूंचा जाती पांच आहेत, १ **सकर्मक** २ **अकर्मक** ३ **उभयविध** ४ **भावकर्तृक** आणि ५ **प्रयोज्य.**

कर्त्याचा व्यापाराचें फल दुसऱ्यावर असतें अशा अर्थाचा जो धातु तो **सकर्मक**; जसें, तो चित्र **करितो** एथें कर्त्याचा व्यापाराचें सिद्धिरूप फल चित्रावर आहे, अशा अर्थाचा **कर** धातु होय, ह्मणून हा सकर्मक; या जातीचे जे सर्व धातु ते सकर्मक जाणावे.

कर्त्याचा व्यापार आणि त्यापासून होतें जें फळ हीं दोनहि कर्त्या वरच राहतात अशाअर्थाचा जो धातु तो **अकर्मक** होय. जसें तो **निजतो**, एथें कर्त्याचा निजण्याचा व्यापार आणि त्याचें फळ दोनहि कर्त्या वरच राहतात, ह्मणून **निज** धातु अकर्मक होय.

सकर्मक आणि अकर्मक असा दोनाहि प्रकारचा ज्याचा प्रयोग होतो तो **उभयविध**; जसें, तो दार **उघडितो** या अर्थीं हा धातु सकर्मक आणि दार आपणच **उघडतें** या अर्थीं हाधातु अकर्मक; या जातीचे जे दुसरे सर्व धातु ते उभयविध जाणावे.

भाव ह्मणजे धातूचा अर्थ तोच जामध्यें कर्ता

असतो तो **भावकर्तृक**; जसें, **कळमळतें, मळमळतें, उजाडतें** इत्यादि.

मुख्य कर्त्याचा व्यापार दुसऱ्या कर्त्याचा व्यापारास प्रयोजक होतो, अशा अर्थाचा जो धातु त्यास **प्रयोज्य** ह्मणावें. जसें, तो त्यास **निजवितो** हा मुख्य कर्त्याचा व्यापार, निजणाराचा निजण्याचा व्यापारास प्रयोजक झाला; अशा अर्थाचा हा निजव धातु होय ह्मणून यास प्रयोज्य ह्मणावें.

धातूवरून काल, पुरुष इत्यादि बोधक प्रत्यय लागून क्रियापदें होतात. आज्ञार्थीं द्वितीय पुरुषैकवचनीं प्रत्ययावांचून केवळ जें धातूचें मूळरूप तेंच **क्रियापद** होतें; जसें तूं **कर, बोल, नीज**, इत्यादि हेंच धातूचें मुख्य स्वरूप जाणावें.

धातूंस तीनकाळांचे प्रत्यय, तीन पुरुष आणि तीन लिंगें विवक्षानुरूप लागून क्रियापदें सिद्ध होतात.

काळ तीन आहेत १ **वर्तमान** २ **भूत** आणि ३ **भविष्य**. विद्यमानीं चालता जो काळ तो

**वर्तमान**; गेला जो काळ तो **भूत** आणि येणारा जो काळ तो **भविष्य**.

क्रियापदांचीं रूपें- **स्वार्थ, संशयार्थ, विध्यर्थ** आणि **शक्यार्थ** अशीं चार प्रकारचीं आहेत. त्यांत स्वार्थ रूपाचा पोटीं **रीत्यर्थ** आहे, आणि विध्यर्थाचा पोटीं **आज्ञा, प्रश्न, प्रार्थना, आशीर्वाद, मनोरथ, गतकथा स्मरण** इत्यादि अर्थ असतात.

धातूंस वर्तमानादि तीन काळांचे प्रत्यय लागून जीं रूपें होतात तीं स्वार्थ रूपें होत. जसें,

**तो जातो** हें वर्तमान काळींचें स्वार्थरूप.

**तो गेला** हें भूतकाळींचें स्वार्थरूप.

**तो जाई** हें रीतिभूतकाळींचें स्वार्थरूप.

**तो जाईल** हें भविष्य काळींचें स्वार्थरूप.

धातूंस संशयार्थी प्रत्यय लागून जीं क्रियापदांचीं रूपें होतात त्यांस संशयार्थ रूपें ह्मणावीं. जसें, जरमी **असतोंतर**, तूं **असतास** इत्यादि.

विध्यर्थ ह्मणजे आज्ञा, प्रश्न, प्रार्थना इत्यादि अर्थीं धातूंवरून प्रत्यय होऊन जीं रूपें होतात तीं.

विध्यर्थ रूपें होत; जसें, आज्ञा- तूं लिही. प्रश्न- मी लिहूं? प्रार्थना- आपण कृपाकरून माझे घरीं यावें. आशीर्वाद- तुझें कल्याण असो. मनोरथ- आपण यात्रेस जाऊं तेथें दऊत घेऊं. गतकथा- स्मरण- घटकेंत पाऊस यावा घटकेंत वारा यावा अशी अवस्था होई इत्यादि.

धातूंस शक्यार्थी प्रत्यय लागून जीं क्रियापदें होतात तीं शक्यार्थ रूपें होत. जसें, माझाने- तुझाने त्याचाने लिहिववतें, लिहिववलें, लिहिववेल इत्यादि.

धातुरूपांस साहायकारी धातूंचीं क्रियापदें पुढें लागून संयुक्त क्रियापदें होतात. जसें, तो करीत होता, बसला होता इत्यादि.

सहाय कारी धातु- अस, हो, चुक, बस, टाक, लाग, जा इत्यादि होत.

## स्वार्थी वर्तमानकाळीं संयुक्त क्रियापदें.

अपूर्ण वर्तमानकाळ- जसें, तो लिहीत आहे,

लिहितो आहे, लिहीत बसला आहे, लिहूं लागला आहे, हीं क्रियापदें कृतीची अपूर्णता आणि चालूपणा दर्शवितात.

भूत वर्तमानकाळ- जसें, मी ग्रंथ लिहिला आहे, मी निजलों आहें, हीं क्रियापदें भूतकालिक कृतीचें फल वर्तमानकाळीं आहे, असा अर्थ दाखवितात. अशा रीतीने सर्व संयुक्त क्रियापदांचे प्रयोगानुसार अर्थ जाणावे.

भविष्य वर्तमानकाळ- जसें, तो लिहिणार आहे, तो निघणार आहे इत्यादि.

रीति वर्तमान- जसें, मी लिहीत असतों, मी लिहीत बसला असतों इत्यादि.

विध्यर्थी संयुक्त क्रियापदें होतात परंतु त्यांचा निर्वाह अन्यरीतीने केला जाईल.

शक्यार्थ अपूर्ण वर्तमानकाळ- जसें, माझाने लिहिवत आहे, माझाने लिहीत बसवत आहे इत्यादि.

शक्यार्थ भूत वर्तमानकाळ- जसें, माझाने लिहिवलें नाहीं, बसवलें नाहीं इत्यादि.

शक्यार्थ भविष्य वर्तमानकाळ. असें, माझानें लिहिववणार नाहीं, बसवणार नाहीं इत्यादि.

स्वार्थी भूतकाळाचीं संयुक्तक्रियापदें.

अपूर्ण भूतकाळ. असें, तो लिहीत होता, लिहीत बसला होता, लिहूं लागला होता इत्यादि; यांसच वर्तमान भूतकाळ हि ह्मणतात.

भूत भूतकाळ. असें, त्याणें लिहिलें होतें, तो बसला होता इत्यादि.

भविष्य भूतकाळ. असें, तो लिहिणार होता, तो बसणार होता इत्यादि.

पूर्णभूतकाळ. असें, तो लिहिताझाला, तो बसताझाला इत्यादि.

आजपर्यंत तो बोलत चालत नव्हाता, परंतु तो आलीकडे बोलता चालता झाला, हें संयुक्त क्रियापद नव्हे एथें बोलता चालता हीं धातुसाधित विशेषणें होत.

रीति भूतकाळ. असें, मी नित्य लिहीत जाई, खेळत जाई, लिहीत असें, खेळत असें इ०.

संशय किंवा संकेतार्थक अपूर्ण भूतकाळ. असें,

जर तो लिहीत असला, जर तो लिहीत बसत असता, जरतो लिहीत बसत असला इत्यादि.

संशयार्थ भूत भूतकाळ- जसें, जर त्याणे लिहिलें असलें, जर त्याणे लिहिलें असतें, जर तो निजला असला, जर तो निजला असता इत्यादि.

संशयार्थ भविष्य भूतकाळ- जसें, जर तो लिहिणार असला, जर तो लिहिणार असता, जर तो निजणार असला, जर तो निजणार असता इत्यादि.

## भूतकाळाचीं शक्यार्थी संयुक्त क्रियापदें.

शक्य अपूर्ण भूतकाळ- जसें, माझ्याने लिहिववत होतें, त्याचाने रहाववत होतें इत्यादि.

शक्य भूत भूत काळ- जसें, माझ्याने तें काम करवलें गेलें, माझ्याने बसवलें होतें इत्यादि.

शक्य भविष्य भूतकाळ- जसें इतका ग्रंथ

माझाने लिहिववणार होता? इतका वेळ माझाने बसवणार होतें? इत्यादि.

शक्य संशय अपूर्ण भूतकाळ- असें, जर माझाने लिहिववत असतें, जर माझाने लिहिववत असलें इत्यादि.

शक्य संशय भूतभूतकाळ- असें, जर माझाने लिहिववलें असतें, जर माझाने लिहिववलें असलें इत्यादि.

शक्य संशय भविष्य भूतकाळ- असें जर त्याचाने लिहिववणार असतें, त्याचाने लिहिववणार असलें, त्याचाने बसवणार असतें, त्याचाने बसवणार असलें इत्यादि.

## स्वार्थीं भविष्यकाळाचीं संयुक्त क्रियापदें.

अपूर्ण भविष्यकाळ- असें, तो लिहीत जाईल, तो लिहूं लागेल, तो बसत जाईल, तो बसूं लागेल, मी लिहीत असेन इत्यादि.

भूत भविष्य काळ- असें, तें पुस्तक माझा हातू-

न लिहिलें जाईल, हें काम झालें जाईल इत्यादि

भविष्य भविष्य काळ- जसें, तो लिहिणार असेल, मी निजणार असेन इत्यादि.

## संशयार्थी भविष्यकाळाचीं संयुक्त क्रियापदें.

संशयार्थ अपूर्ण भविष्य काळ- जसें जरमी लिहीत असेन, जर मी वसत असेन इत्यादि.

संशयार्थ भूत भविष्य काळ- जसें, जर त्याणें पत्र लिहिलें असेल, जर मी निजलों असेन इत्यादि.

संशयार्थ भविष्य भविष्यकाळ- जसें जर तो पत्र लिहिणार असेल, मी निजणार असेन इत्यादि.

शक्य अपूर्ण भविष्य. जसें, जर माझाने लिहिववत असेल, माझाने बसवत असेल इत्यादि.

याप्रमाणे संयुक्त क्रियापदें सहायकारी धातूंचीं क्रिया-

पद संयोगेंकरून बहुत होतात तीं या रीतीनें जाणावीं. कोणत्याहि क्रियापदाचा मागें किंवा पुढें जर, तर यांचा संबंध झाला असतां तीं क्रिया पदें संशयार्थीं किंवा संकेतार्थीं होतात; उदाहरण, जर तूं जातोस तर मी येतों, जर तूं जाशील तर मी येईन, जर तूं गेलास तर मी हि आलों असें समज इत्यादि.

धातूंस वर्तमानादि कालबोधक प्रत्यय लागतात.

## धातूंचा प्रत्यय माळा.

## वर्तमान काळतों आदि प्रत्यय.

| | प्र. ए. | प्र. अ. | द्वि.ए. | द्वि अ | तृ.ए | तृ.अ. |
|---|---|---|---|---|---|---|
| पु० | तों | तों | तोस | ता, तां | तो | तात. |
| स्त्री० | त्यें तें | तों | त्येस | ता, तां | त्ये | तात. |
| | ती | | तीस | | ते, ती | |
| न० | तें, तों | तों | तेंस | ता, तां | तें | तात. |

## भूतकाळीं कर्तरि लोंआदि प्रत्यय.

| | प्र.ए. | प्र. अ. | द्वि. ए. | द्वि. अ. | तृ. ए. | तृ. अ. |
|---|---|---|---|---|---|---|
| पु० | लों. | लों. | लास. | लेत, लां लांत. | ला. | ले. |
| स्त्री० | ल्यें. लें. | लों. | लीस. | ल्यात, लीत, लां लांत. | ली. | ल्या. |
| न० | लों. | लों. | लेंस. | लां, लांत, लींत. | लें. | लीं. |

## भूतकाळीं लिंगत्रयीं कर्मणि लादि प्रत्यय माळा.

| | प्र.ए. | प्र. अ. | द्वि. ए. | द्वि. अ. | तृ. ए. | तृ. अ. |
|---|---|---|---|---|---|---|
| ए० | ला. ली. लें. | ला. ली. लें. | लास, ला लीस, ली. लेंस, लें. | लात, ला. लीत, ली. लेंत, लें. | ला. ली. लें. | ला. ली. लें. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ० | ले.<br>ल्या.<br>लीं. | ले.<br>ल्या.<br>लीं. | लेस, ले.<br>ल्यास,<br>ल्या.<br>लींस, लीं. | लेत, ले.<br>ल्यात,<br>ल्या.<br>लींत, लीं. | ले.<br>ल्या.<br>लीं. | ले.<br>ल्या.<br>लीं. |

## रीति भूतकाळाचे ईआदि प्रत्यय.

| प्र. ए. | प्र. अ. | द्वि. ए. | द्वि. अ. | तृ. ए. | तृ. अ. |
|---|---|---|---|---|---|
| ई. | ऊं | ईस.<br>स. | आ. | ई. | ईत.<br>त. |

## संशय किंवा संकेतार्थ भूतकाळाची तों आदि प्रत्यय माळा.

| | प्र. ए. | प्र. अ. | द्वि. ए. | द्वि. अ. | तृ. ए. | तृ. अ. |
|---|---|---|---|---|---|---|
| पु० | तों. | तों. | तास. | तेत.<br>तां, ता. | ता. | ते. |
| स्त्री. | त्यें, तें. | तों. | तीस. | त्यात,<br>तां, ता. | ती. | त्या. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| न० | तीं. तें. | तों. | तेंस. | तींत. तां. | तें. | तीं. |

## भविष्यकाळाचे लिंगत्रयीं ईनादि प्रत्यय.

| प्र. ए. | प्र. अ. | द्वि. ए. | द्वि. अ. | तृ. ए. | तृ. अ. |
|---|---|---|---|---|---|
| ईन. | ऊं | शील. | आल. | ईल. | तील. |

## विध्यर्थीं लिंगत्रयीं ऊंआदि प्रत्यय.

| प्र. ए. | प्र. अ. | द्वि. ए. | द्वि. अ. | तृ. ए. | तृ. अ. |
|---|---|---|---|---|---|
| ऊं. | ऊं. | अ. | आ. | ऊ. ओ | ऊत, ओत. |

या सात प्रत्ययमाळा आहेत यांतील वर्तमान, कर्तरि भूत, कर्मणिभूत, संशय किंवा संकेतार्थभूत, या चार प्रत्ययमाळांतील प्रत्ययधातूंपुढें असतां तीन लिंगीं क्रियापदांचा रूपभेद होतो, यावांचून इतर प्रत्ययमाळांतील प्रत्यय पुढें असतां रूपभेद होत नाहीं.

हे प्रत्यय सकर्मक धातूंवरून कर्तरि आणि कर्मणि होतात; आणि अकर्मक धातूंवरून कर्तरि

आणि भावीं होतात. लादि प्रत्यय कर्मणि मात्र होतात.

बोलादिगणभिन्न धातूंपुढें व्यंजनादि प्रत्यय असतां, अकारांत सकर्मक धातूंचा अंत्यास इ निवर्तक विकल्पें होतो; उ० तो करितो, जोडतो जोडितो इत्यादि.

सकर्मक संस्कृत अकरांत नामधातूंचा अंत्यास इ प्रायः नित्यें होतो; उ० इच्छितो, स्तवितो, इत्यादि.

स्वार्थादि अर्थांचीं रूपें दाखवायासाठीं प्रथम सकर्मक धातु घेतों.

## सकर्मक जोडधातूचीं वर्तमानकाळीं स्वार्थी ३ लिंगीं रूपें लोंआदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मीजोडितों.<br>स्त्री० मीजोडित्यें-तें- तीं.<br>न० मीजोडितों-तें. | आह्मीजोडितों. |

| | | |
|---|---|---|
| २ | पु० तूं जोडितोस. स्त्री० तूं जोडित्येस- तेस- तीस. न० तूं जोडितेंस. | तुह्मी जोडिता, जोडितां. |
| ३ | तो जोडितो. ती जोडित्ये- ते- ती- तें जोडितें. | ते त्या तीं जोडितात. |

## भूतकाळ कर्मणि लादिप्रत्यय.

### प्रथमपुरुष.

| | |
|---|---|
| मी-म्या-आह्मी. | पु. जोडिला जोडिले. स्त्री. जोडिली जोडिल्या. न. जोडिलें जोडिलीं. |

### द्वितीयपुरुष.

| | | | |
|---|---|---|---|
| तूं-त्वां | पु- | जोडिला-लास, जोडिले- लेस- | तुह्मी जोडिला-लात, जोडिले- लेत. |
| | स्त्री. | जोडिली- लीस, जोडि- ल्या-ल्यास. | जोडिली-लीत, जोडिल्या- ल्यात. |

तूं त्वां न. { जोडिलें-लेंस, जोडि-लीं-लींस, } तुह्मी { जोडिलें-लेंत, जोडिलीं-लींत.

## तृतीयपुरुष.

त्याणे-तिणे-त्याणे-त्यांणीं-त्यांहीं. {
पु० { जोडिला-जोडिले.
स्त्री० { जोडिली-जोडिल्या.
न० { जोडिलें-जोडिलीं.

## रीति भूतकाळीं २ लिंगीं ईआदि प्रत्यय.

| एकवचन. | | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | मीजोडीं | आह्मीजोडूं. |
| २ | तूंजोडींस. | तुह्मीजोडा. |
| ३ | तो-ती-तें जोडी. | ते-त्या-तीं जोडीत. |

## संशय किंवा संकेतार्थं भूतकाळीं तोंआदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मीजोडितों, स्त्री० जोडित्यें तें-ती. न० जोडितों- तें. | आह्मीजोडितों. |
| २ | पु० तूंजोडितास. स्त्री० जोडितीस. न० तूं जोडितेंस. | तुह्मी जोडितां जोडितेत. जोडितां- त्यात. जोडितींत. जोडितींत. |
| ३ | तो जोडिता. ती जोडिती. तें जोडितें. | तेजोडिते. त्याजोडित्या. तींजोडितीं. |

## स्वार्थी भविष्यकाळीं २ लिंगीं रूपें.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | मी जोडीन. | आह्मीजोडूं. |
| २ | तूं जोडिशील. | तुह्मीजोडाल. |
| ३ | तो-ती-तें जोडील. | ते-त्या-तीं जोडितील. |

## विध्यर्थी लिंगत्रयीं रूपें.

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ मी जोडूं. | आह्मी जोडूं. |
| २ तूं जोड. | तुह्मी जोडा. |
| ३ { तो-ती-तें जोडू, जोडो. | ते-त्या-तीं जोडूत, जोडोत. |

## विध्याद्यर्थी.

धातूंवरून तीन लिंगीं क्रमाने आवा, आवी आवें प्रत्यय होतात; हे प्रत्यय सकर्मक धातूंवरून कर्मणि आणि अकर्मक धातूंवरून कर्तरि आणि भावीं होतात उदाहरण.

प्रथम पुरुष एकवचन मी- म्या आणि अनेक वचन आह्मी जोडावा, जोडावी, जोडावें, अ० जोडावे, जोडाव्या, जोडावीं.

द्वि० पु० एकवचन तूं- त्वां जोडावा- वास, जोडावी- वीस, जोडावें- वेंस अ० जोडावे- वेस, जोडाव्या- व्यास, जोडावीं- वींस, अ० व० तुह्मी- जोडावा-

वात, ओडावी- वीत, ओडावें- वेंत, अ० ओडावे- वेत, ओडाव्या- व्यात, ओडावीं- वींत.

तृ० पु० एकवचन त्याणे- तिणे- त्याणें आणि अ० व० त्याणीं- त्याहीं- ओडावा, ओडावी, ओडावें, अ० ओडावे, ओडाव्या, ओडावीं.

## शक्य वर्तमान काळ लिंगत्रयीं रूपें.

एकवचन माझाने- तुझाने- तिचाने- त्याचाने आणि अ० व० आमचाने- तुमचाने- त्यांचाने ओडवतो, ओडवत्ये- ओडवते, ओडवतें, अ० ओडवतात.

## शक्यार्थ भूतकाळ लिंगत्रयीं रूपें.

ए० व० माझाने- तुझाने- त्याचाने- तिचाने- त्याचाने आणि अ० व० आमचाने- तुमचाने- त्यांचाने ओडवला, ओडवली, ओडवलें, अ० ओडवले, ओडवल्या, ओडवलीं.

## शक्यार्थ रीतिभूत.

ए० माझाने- तुझाने- त्याचाने- तिचाने- त्याचाने अ० व० आमचाने- तुमचाने- त्यांचाने ओडवे, अ० व० ओडवत.

## शक्यार्थ भविष्यकाळ

## लिंगत्रयीं रूपें.

ए० व० माझाने. तुझाने. त्याचाने. तिचाने. त्याचाने आणि अ० व० आमचाने. तुमचाने. त्यांचाने जोडवेल.

जोडधातूचीं संयुक्त क्रियापदें पूर्वीं लिहिलेल्या लिहिधातूचा संयुक्त क्रियापदां प्रमाणे जाणावीं.

## अकर्मक बसधातु तों आदि कर्तरि प्रत्यय वर्तमानकाळ.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मी बसतों.<br>स्त्री० बसत्यें. तें. ती.<br>न० बसतों. तें. | आह्मी बसतों. |
| २ | पु० तूं बसतोस.<br>स्त्री० बसत्येस. तीस. ती.<br>न० बसतेंस. | तुह्मी { बसतां,<br>बसता. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पु० तो वसतो. | ते | वसतात. |
| | स्त्री० तीवसत्ये-ते-ती. | त्या | |
| | न० तें वसतें. | तीं | |

## भूतकाळ लोंआदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ मी | पु० बसलों | आम्ही बसलों. |
| | स्त्री० बसल्यें-लें-ली. | |
| | न० बसलों-लें. | |
| २ तूं. | पु० बसलास. | बसलेत. बसलांत. बसलां |
| | स्त्री. वसलीस. | तुम्ही बसल्यात. बसलां बसलांत. वसलींत. |
| | न० बसलेंस. | बसलां. बसलांत. बसलींत. |
| ३ | पु० तो बसला. | ते बसले. |
| | स्त्री० ती बसली. | त्या बसल्या. |
| | न० तें बसलें. | तीं बसलीं. |

## रीतिभूतकाळ ई आदि प्रत्यय.

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ मी बसें. | आह्मी बसूं. |
| २ तूं बसस. | तुह्मी बसा. |
| ३ तो- ती- तें बसे. | ते- त्या- तीं बसत. |

## संशय किंवा संकेतार्थ भूतकाळ तों आदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- | --- |
| १ | पु० मी बसतों.<br>स्त्री० मी बसत्यें-तें.<br>न० मी बसतों-तें. | आह्मी बसतों. |
| २ | पु. तूं बसतास<br>स्त्री. तूं बसतीस.<br>न. तूं बसतेंस. | तुह्मी बसतेत. बसतां<br>बसत्यात. बसतां<br>बसतींत. बसतां |
| ३ | पु. तो बसता.<br>स्त्री० ती बसती.<br>न० तें बसतें. | ते बसते.<br>त्या बसत्या.<br>तीं बसतीं. |

## भविष्यकाळीं लिंगत्रयीं रूपें ईनादि प्रत्यय.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ मी बसेन. | आह्मी बसूं |
| २ तूं बसशील. | तुह्मी बसाल. |
| ३ तो- ती- तें बसेल. | ते- त्या- तीं बसतील. |

## विध्यर्थी लिंगत्रयीं रूपें ऊं आदि प्रत्यय.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| प्र० मी बसूं. | आह्मी बसूं. |
| द्वि० तूं बईस, बस, बैस. | तुह्मी बसा. |
| तृ० तो- ती- तें बसू, बसो, | ते- त्या- तीं बसूत, बसोत. |

## विध्यर्थी आवा प्रत्ययांताचीं रूपें कर्तरि.

ए० मी बसावा. अ० आह्मीबसावे. स्त्री० मी

बसाव्यें- वी. अ० आह्मी बसाव्या. न० मी बसावें- चा. अ० आह्मी बसावों- वें. द्वि० ए० पु० तूं बसावास. अने० व० तुह्मी बसावेंत. स्त्री० ए० तूं बसावीस. अ० तुह्मी बसाव्यात. न० तूं बसावेंस. अ० तुह्मी बसावेंत.- वींत. तृ० ए० पु० तो बसावा. अ० ते बसावे. स्त्री० ती बसावी. अ० त्याबसाव्या. न० तें बसावें. अ० तीं बसावीं. भावीं म्या- मी अ० आह्मी. त्वां- तूं. अ० तुह्मी. त्याणे- त्याणीं स्त्री० तिणे. त्याणीं न० त्याणे- त्याणीं बसावें.

याप्रमाणे प्रायः सर्व अकर्मक धातूंचां विध्यर्थी आवा प्रत्ययांतार्ची रूपें जाणावीं.

## शक्यार्थी लिंगत्रयीं

## रूपें कर्मणि.

प्र० ए० माझाने. अ० आमचाने. द्वि० ए० तुझाने. अ० तुमचाने. तृ० ए० त्याचाने- तिचाने त्याचाने. अ० त्यांचाने. बसवतो, बसवत्ये- ती, बसवतें. अ० बसवते- बसवत्या- बसवतीं. भूत०

वसवला· वसवली· वसवलें. अ० वसवले· वस· वल्या· वसवलीं. भावीं वसवतें. वसवलें. वस वेल.

वस धातूचीं संयुक्त क्रियापदें प्रायः पूर्वीं संयुक्त क्रियापद विचारांत लिहिलीं आहेत ह्मणून एथें लिहिलीं नाहींत.

## साहाय्यकारि धातु विचार.

साह्यकारिधातु तोहोय जाचींस्वातंत्र्यें करून क्रियापदें होऊन तीं इतर धातुरूपांपुढें ही लागून संयुक्त क्रियापदें होतात; उ० तो करिताझाला, तो बसलाहोता इत्यादि. सहाय्यकारि धातु· अस हो, चुक, टाक, बस, लाग, जा, फस, दे, उठ इत्यादि आहेत यांत, अस आणि हो धातूचा क्रि· यापद संयोगानें जीं संयुक्त क्रियापदें होतात तीं वरसांगीतलीं यांवांचून, चुक, टाक, बस, इत्यादि धातूंचा क्रियापदांचा संयोग ऊन प्रत्ययांत इतर धातुरूपांपुढें होतो, उ० तो बोलूनचुकला, त्याणें· तेंकाम करूनटाकिलें, तोत्यासरुपये देऊनब·

सला, तो बोलूनफसला, तो समजूनगेला, माझेंकाम करूनदे इत्यादि.

देधातूचा क्रियापदाचा संयोग, ऊं प्रत्ययांत धातुरूपांपुढें होतो. उ० करूंदेतो, करूंदिलें, करूंदेईल इ०. याप्रमाणे लाग, जा, बस, यांचा क्रियापदांचाही ऊं प्रत्ययांत धातुरूपांपुढें संयोग होतो. उ० करूंलागला, करूंगेला, जेऊंबसला इ०. तांत धातुरूपांपुढें बस आणि जा धातूंचा क्रियापदांचा संयोग होतो. उ० तो पढतबसला, खातबसला, बोलतगेला, करीतगेला इत्यादि.

आयांस आवयास एतत्प्रत्ययांत धातुरूपांपुढें ही यांतील कित्येक धातूंचा क्रियापदांचा संयोग होतो. उ० तो लिहावयास चुकला, तो मारावयास उठला, तो जेवायासबसला, करायास- बसला- लागला- गेला इत्यादि.

सहायकारी धातूचा क्रियापदांचा योग इतर धातूंचीं जीं नामें किंवा विशेपणे किंवा अव्ययें यांशीं प्रायशः होतो, ह्मणून अशा क्रियापदांस संयुक्त

क्रियापदें असें नाव दिलें आहे; वस्तुतः संयुक्त क्रियापदें मानावयाची अगदीं गरज नाहीं परंतु इंग्रेजी व्याकरणास अनुसरून संयुक्त क्रियापदें मानिलीं आहेत.

## अस धातूचे विशेष आणि लिंगत्रयीं रूपें.

अस धातूचीं रूपें वर्तमानकाळीं तीन प्रकारचीं होतात, त्यांत मी आहें, इ० रूपें, ईं आदि प्रत्यय लागून होतात, ते प्रत्यय पुढें असतां असधातूस आह निवर्तक होतो. संधि पूर्ववत्.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | मी आहें. | आह्मी आहों. |
| २ | तूं आहेस. | तुह्मी आहा-आहांत. |
| ३ | तो-ती-तें आहे. | ते. त्या. तीं आहेत. |

या रूपांचा आकारास निषेधार्थक **ना** निवर्तक होतो तेव्हां, मी नाहीं तूं नाहीं, तूं नाहींस अ० तुह्मी नाहीं, तुह्मी नाहींत, तृ० तो-ती-तें नाहीं. अ० ते-त्या-तीं नाहींत अशीं रूपें होतात.

## असधातूचीं दुसऱ्या प्रकारचीं वर्तमानकाळीं लिंगत्रयीं रूपें.

| एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|
| १ मी होय. | आह्मी होय. |
| २ तूं होस. | तुह्मी होय व्हा. |
| ३ तो- ती- तें होय. | ते-त्या- तीं होत. |

या रूपांचा मागें नचा योग झाला असतां. प्र० मी नव्हे, आह्मी नव्हों. द्वि० तूं नव्हस. तुह्मी नव्हा, तृ० तो- ती- तें नव्हे. ते- त्या- तीं नव्हत अशीं रूपें फिरतात, यारूपांस प्रत्यय नाहींत.

## अस धातूचीं तिसरे प्रकारचीं वर्तमान काळीं लिंगत्रयीं रूपें तों आदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मी असतों.<br>स्त्री० मी असत्यें-तें-ती.<br>न० मी असतों- तें. | आह्मी असतों. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | पु० तूं असतोस. स्त्री० असत्येस, असतेस, असतीस न० असतेंस. | तुह्मी. | असता-त. |
| ३ | पुं० ते असतो. स्त्री० ती असत्ये-ते-ती. न० तें असतें. | ते त्या तीं | असतात. |

या रूपांचा अला, न निवर्तक होऊन मी नसतों अ० आह्मी नसतों अशीं रूपें होतात यांपासून रीतिबोध होतो; आणि यांचा मागें, असत हें धातुसाधित अव्यय लागलें असतां, रीति सातत्याचा ही बोध होतो; उ० मी असत असतों इत्यादि.

## भूतकाळाचीं ३ लिंगीं रूपें.

इतर धातूंस संशयार्थ भूतकाळीं जे तों आदि प्रत्यय लागतात, तेच या धातूचा मुख्य भूतकाळीं लागतात. तेव्हां अस धातूस हो निवर्तक होतो.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु॰ मी होतों. | आह्मी होतों. |
| | स्त्री॰ मीहोत्यें-तें-ती. | |
| | न॰ मी होतों-तें. | |
| २ | पु॰ तूं होतास. | तुह्मी होतां, होतेत. |
| | स्त्री॰ होतीस. | होतींत, होतां, होत्यात. |
| | न॰ होतेंस. | होतींत, होतां. |
| ३ | तो होता. | ते होते. |
| | ती होती. | त्या होत्या. |
| | तें होतें. | तीं होतीं. |

निषेधार्थी होधातूस नव्ह निवर्तक होतो. तेव्हां रूपें प्र॰ पु॰ मी- आह्मी नव्हतों. द्वि॰ पु॰ तूंनव्हतास अ॰ तुह्मी नव्हतां- नव्हतेत. तृ॰ पु॰ तोनव्हता. अ॰ तेनव्हते. स्त्री॰ मी नव्हत्यें अ॰ आह्मी नव्हतों अशीं होतात इत्यादि.

## रीतिभूतकाळीं ३ लिंगीं रूपें.

रीत्यर्थी ई आदि प्रत्यय होतात. त्यांत ईस आणि ईत यांचा इकाराचा लोप होतो. उदाह॰

| | प्र० | द्वि० | तृ० |
|---|---|---|---|
| ए० | मीअसें. | तूं असस. | तो-ती-तें असे. |
| अ० | आह्मीअसूं असों | तुह्मी असा. | ते-त्या-तीं-असत. |

सातत्यरूप अर्थाची विवक्षा असतां यारूपांचा-मागें असत हें अव्यय लागतें. उ० मी असत असें. तूंअसत असस इत्यादि.

## संशयार्थ भूतकाळीं लिंगत्रयीं रूपें तोंआदिप्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मी असतों.<br>स्त्री० असत्यें-तें.<br>न० असतों-तें. | आह्मी असतों. |
| २ | पु० तूं असतास.<br>स्त्री० असतीस.<br>न० असतेंस. | तुह्मी. पु० असतेत, असतां.<br>स्त्री० असत्यात, असतींत, असतां.<br>न. असतींत, असतां |

| | | |
|---|---|---|
| | पु० तोअसता. | ते असते. |
| ३ | स्त्री० तीअसती. | त्या असत्या. |
| | न० तेंअसतें. | तीं असतीं. |

निषेध विवक्षा असतां वरचा रूपांचा अकारास न निवर्तक होतो, उ० मी नसतों, तूं नसतास इत्यादि.

## स्वार्थीं भविष्यकाळीं लिंगत्रयीं रूपें ईनादि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | मी असेन. | आह्मीअसूं. |
| २ | तूं असशील. | तुह्मीअसाल. |
| ३ | तो, ती, तें असेल. | ते, त्या, तीं असतील. |

रीति सातत्याची विवक्षा असतां या रूपांचा मागें असत हें अव्यय लागतें, उ० मी असत असेन, तूं असत असशील इत्यादि.

निषेध विवक्षा असतां अला न निवर्तक होतो उ० मी नसेन, तूं नसशील इत्यादि.

## संशय भविष्यार्थीं तीनलिंगीं रूपें.

### लोंआदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- | --- |
| १ | पु० मी असलों.<br>स्त्री० असल्यें-लें.<br>न० असलें-लें. | आह्मी असलों. |
| २ | पु० तूं असलास.<br>स्त्री० असलीस.<br>न० असलेंस. | तुह्मी. असलां-लांत,<br>असलेत.<br>असल्यात-लांत,<br>असलींत-लीं.<br>असलां-लांत,<br>असलींत. |
| ३ | पु० तोअसला.<br>स्त्री० तीअसली.<br>न० तें असलें. | ते असले.<br>त्या असल्या.<br>तीं असलीं. |

निषेधविवक्षा असतां अला न निवर्तक होऊन मी नसलों, तूं नसलास अशीं रूपें होतात.

## विध्यर्थी लिंगत्रयीं रूपें ऊंआदि प्रत्यय.

| एकवचन. | | अनेकवचन. | |
|---|---|---|---|
| १ मी असूं. | | आह्मी असूं. | |
| २ तूं अस, अईस, ऐस. | | तुह्मी असा. | |
| ३ तो, ती, तें | असो, असू. | ते, त्या, तीं | असोत, असूत. |

विध्यर्थी आवा प्रत्ययांताचीं रूपें कर्तरि आणि भावीं वसधातूचा आवा प्रत्ययांत रूपां सारिखीं जाणावीं. उ० प्र० ए० मी असावा, तूं असावास इत्यादि.

## शक्यार्थी लिंगत्रयीं रूपें.

माझाने· आमचानें· तुझाने· तुमचाने· त्याचाने तिचाने· त्याचानें· त्यांचाने· असवतें· असवलें, असवेल इत्यादि.

## हो धातूचीं रूपें वर्तमानकाळीं लिंगत्रयीं तोंआदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मी होतों.<br>स्त्री० मीहोत्यें-तें.<br>न० मी होवों-तें. | आह्मी होतों. |
| २ | पु० तूं होतोस.<br>स्त्री० होत्यस-तीस.<br>न० होतेंस. | तुह्मी होतां-ता. |
| ३ | पु० तो होतो.<br>स्त्री० तीहोत्ये-ती.<br>न० तें होतें. | ते<br>त्या<br>तीं होतात. |

या रूपांस नाहीं याचा योग झाला असतां मी नाहीं होत, तूं होतनाहींस अशीं रूपें होतात.

## भूतकाळीं लिंगत्रयीं रूपें लों आदि प्रत्यय.

हो धातूस झा, जा, जहा जाइ पर्यायाने निवर्तक होतात.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मीझालों.<br>स्त्री० मीझाल्यें-लें.<br>न० मीझालों-लें. | आह्मी झालों. |
| २ | पु० तूं झालास.<br>स्त्री० तूंझालीस.<br>न० तूंझालेंस. | तुह्मी झालेत, झाला, झालांत. झाल्यात, झाला-झालांत-झालींत. झाला-झालींत झालांत. |
| ३ | पु० तो झाला.<br>स्त्री० ती झाली.<br>न० तें झालें. | ते झाले.<br>त्या झाल्या.<br>तीं झालीं. |

पक्षीं जालों, जह्मालों इत्यादि रूपें होतात.

## रीति भूतकाळ लिंगत्रयीं रूपें ईआदि प्रत्यय.

द्वितीय पुरुषाचा अनेक वचनीं हो धातूस, व्हा निवर्तक होतो.

| | प्र० | द्वि० | तृ० |
|---|---|---|---|
| ए० | मी होईं. | तूं होईस, होस. | तो-ती-तें होई. |
| अ० | आह्मी होऊं. | तुह्मी व्हा. | ते-त्या-तीं होत. |

## संशयार्थ भूतकाळीं लिंगत्रयीं रूपें तों आदि प्रत्यय.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| १ | पु० मी होतों.<br>स्त्री० मी होत्यें-तें.<br>न० मी होतों-तें. | आह्मी होतों. |
| २ | पु० तूं होतास.<br>स्त्री० होतीस.<br>न० होतेंस. | तुह्मी होतेत, होतां.<br>होतां, होत्यात,<br>होतींत.<br>होतां, होतींत. |
| ३ | पु० तो होता.<br>स्त्री० ती होती.<br>न० तें होतें. | ते होते.<br>त्या होत्या.<br>तीं होतीं. |

## भविष्यकाळीं लिंगत्रयीं रूपें ईनादि प्रत्यय.

| | प्र० पु० | द्वि० पु० | तृ० पु० |
|---|---|---|---|
| ए० | मी होईन. | तूं होशील. | तो-ती-तें होईल. |
| अ० | आह्मी होऊं. | तुह्मी व्हाल. | ते-त्या-तीं होतील. |

## विध्यर्थीं लिंगत्रयीं रूपें ऊं आदि प्रत्यय.

द्वितीय पुरुषैकवचनीं सर्व धातूंपुढील अ प्रत्ययाचा लोप होतो आणि द्वितीय पुरुषाचा अनेक वचनीं हो धातूला व्हा निवर्तक होतो.

| | प्र० पु० | द्वि० पु० | तृ० पु० |
|---|---|---|---|
| ए० | मी होऊं. | तूं हो. | तो-ती-तें होऊ-ओ. |
| अ० | आह्मी होऊं. | तुह्मी व्हा. | ते-त्या-तीं होऊत-ओत. |

विध्यर्थीं धातूवरून आवा, आवी, आवें इत्यादि प्रत्यय होतात; तेव्हां हो धातूस, व्हा निवर्तक होतो; उ० पु० व्हावा, स्त्री० व्हावी, न० व्हावें इ० रूपें असधातूचा रूपांप्रमाणे जाणावीं.

## विध्यर्थी संयुक्त क्रियापद विचार.

विध्यर्थी संयुक्त क्रियापदें होतात, परंतु त्यांचा निर्वाह अन्य रीतींने केला जाईल ह्मणून संयुक्त क्रियापद विचारीं लिहिलें. विध्यर्थी संयुक्त क्रियापदें. उ० भात **करावा लागतो**, चाकरी **करावी लागत्ये**, देवास **भजावें लागतें**; एथें **करावा, करावी** हीं धातुसाधित नामें मानिल्यास चिंता नाहीं; वस्तुगत्या **करावा, करावी** इत्यादिक उदाहरणे संस्कृतांतील तुमुन् प्रत्ययांत अव्ययांचा जातीचीं आहेत; परंतु यांचीं लिंग वचनें फिरतात इतकाच विशेष आहे. भात **करावा-लागतो** या प्रयोगाचा अर्थी **करावयासलागतो** असेंही होतें तेव्हां याच जातीचें हें अव्यय मानण्यास चिंता नाहीं. तस्मात् आवा प्रत्ययांता पुढें साहाय्यकारी क्रियापद संयोग झाल्यास आवा प्रत्ययांत क्रिया विशेषण अव्यय मानावें. जसें, मी तुला **भला पकडला- भली पकडली- भलें पकडलें** या स्थळीं **भला, भली, भलें** यांचीं लिंगव-

चने फिरतात तथापि हीं क्रिया विशेषणें होतात असें एथें मानावें.

**तुह्मी जावें होतें, करावें होतें, करावयाचें होतें** या प्रयोगीं **करावें, करावयाचें** यापासून विध्यर्थाचा बोध होतो, आणि **होतें** यापासून भूत काळीं त्या त्या व्यापारांची आवश्यकता होती असा बोध होतो; तथापि हें या अर्थी विशिष्ट क्रियापद मानावें. **तुह्मी करावें होतें,** हा कर्मणि प्रयोग **तुह्मी निजावें होतें** हा भावीं प्रयोग. या रीतीनें या क्रियापदांचा निर्वाह करावा, संयुक्त क्रियापदें मानूंनये.

उघडादि उभयविध धातूंचीं रूपें सकर्मकाकर्मक भेदानें दोन प्रकारचीं होतात. उ० तो द्वार उघडितो, त्याणें द्वार उघडिलें, तो द्वार उघडील, इ०. उ० अकर्मकाचीं, द्वार उघडतें, द्वार उघडलें, द्वार उघडेल इत्यादि.

निषेध किंवा अनुमोदन विवक्षित असतां ना, या अव्ययाचा क्रियापदा पुढें योग होतो; उदाहरण.

| एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- |
| १ मी आणींना | आह्मी आणूंना. |
| २ तूं आणींसना. | तुह्मी आणाना. |
| ३ तो आणींना | ते आणींनात- तना. |

द्वितीय पुरुषाचे क्रियेचा निषेध असतां एक वचनीं नको आणि अनेक वचनीं नका, नकोत या अव्ययांचा योग होतो उ० नको आणूं, आणूं नको, अनेक वचनीं आणूं नका- नकोत, नका आणूं इत्यादि.

बोल, खेळ इ० सकर्मक धातूंचा गणाचीं रूपें अकर्मक धातूंसारिखीं होतात.

बोलादि गण.

बोल, खेळ, चुक, झोंप, नेस, पढ, ह्मण- पांघुर, पोंच, प्रसव, भज, विसर, शिक, सम- ज, स्मर इ०. उ० मी बोललों, बोलेन इ०.

आइकादि जे सकर्मक धातु त्यांचीं कर्तरि ुलैंत प्रत्ययांतावांचून इतर रूपें अकर्मक धातूंचा रूपां- सारिखीं होतात; आइकादि गण आईक, ऐक, जाण, देख, नेण, परिस, माग, वेंघ, सांग इ०,

उ० मी आइकेन, ऐकेन इ०. जेव, खा इत्यादि धातूंवरून कर्त्तरि लों आदि प्रत्यय होतात. उ० भात जेवलें, जेवतों, खाल्लों, जेवलों, खाल्लास, जेवलास इत्यादि-

रिवादि गणास लकारादि प्रत्यय पुढें असतां अंतीं प्रायः विकल्पें दीर्घ निवर्तक होतो.

## रिघादि गण.

रिघ, आंब, उड, उभ, गळ, जळ, जिर, झिज, तड, दड, दब, दिप, निघ, निम, निव, पळ, बुज, बुझ, बुड, मिळ, मुर, ह्मण, लप, विझ, हिंव इ० उ० रिघाला, आंबाला, उडाला पक्षी, गळला, जळला इत्यादि.

करादि गणास भूतकाळाचे लादि प्रत्यय पुढें असतां जे निवर्तक होतात ते.

| धातु | निवर्तक | भूतकाळाचीं रूपें. |
|---|---|---|
| कर | के | केला. |
| मर | मे | मेला. |
| जा | गे | गेला. |

| धातु | निवर्तक | भूतकाळाचीं रूपें. |
| --- | --- | --- |
| ये | आ | आला. |
| हो | झा | झाला. |
| गा | गाइ | गाइला. |
| ध्या | ध्याइ | ध्याइला. |
| मा | माइ | माइला. |

याप्रमाणें करादि गणांतील अन्य धातूंचे निवर्तक व रूपें जाणावीं.

## प्रयोजक प्रत्यय.

प्रयोजकाचा व्यापार विवक्षित असतां धातूंवरून व, इव, वि हे प्रत्यय पर्यायेंकरून होतात; तदंतही धातु होतो ह्मणून त्यावरून तों आदि प्रत्यय होतात; वादि प्रत्ययांत सर्व धातु सकर्मक जाणावे; उ०, पूर्व स्थिति, तो पाणी आणितो, तो त्याकडून आणावितो, आणिवतो, आणवतो तो अडकतो, मी त्याला अडकवितों इत्यादि.

हे प्रत्यय पुढें असतां लिहिधातूस आणि सर्व एकाक्षर धातूंस प्रायः व अवयव लागतो; उ०,

लिहिववितो, भिववितो, पिववितो, खाववितो, घेववितो इत्यादि.

कित्येक धातूंस प्रयोजक प्रत्यय स्थानीं निवर्तक होतात ते.

| धातु. | निवर्तक. | रूपें. |
|---|---|---|
| ये | आण | आणितो. |
| लाग | लाव | लावितो. |
| न्हा | न्हाण | न्हाणितो. |
| जा | घालव | घालवितो. |
| दिस | दाखव | दाखवितो. |
| देख | दाव | दावितो. |
| जुड | जोड | जोडितो. |
| तुट | तोड | तोडितो. |
| फिट | फेड | फेडितो. |
| फुट | फोड | फोडितो. |
| सुट | सोड | सोडितो. |
| फाट | फाड | फाडितो. |
| चर | चार | चारितो. |
| चळ | चाळ | चाळितो. |

इत्यादि या गणावरून दुसऱ्या प्रयोजकाची विवक्षा असतां प्रयोजक प्रत्यय होतात. जसें, **आणतो, आणवितो** इत्यादि.

## धातु साधित शब्द विचार.

सर्व धातु साधित शब्दांचें अनुगम पूर्वक सांगणें अवघड याजकरितां धातूंवरून अनेकार्थीं अनेक प्रत्यय होऊन धातु साधित शब्द सिद्ध होतात त्यांतील कित्येक रीति कळायासाठीं सांगतों.

सर्व धातूंवरून स्वार्थीं **णे** प्रत्यय होतो, तेव्हां तदंत नामें होतात. उ०, **करणे, बोलणे, चालणे** इ० यांचें लिंग नपुंसक या णे प्रत्ययांताचा क्रियापदासारखा आज्ञार्थी प्रयोग होतो. उ०, **तुह्मी हमेशा पत्र लिहीत जाणे** इत्यादि.

विध्यर्थी **आवा, आवी, आवें** एतत्प्रत्ययांत जीं क्रियापदें होतात त्यांत आवें प्रत्ययांत क्रियापदांस नाम मानावें लागतें; परंतु त्या नामास प्रायः प्रथमातिरिक्त विभक्ति लागत नाहीं. उ० मला **जावें** लागतें, **बसावें** लागलें अशा स्थळीं

जावें, बसावें हीं कित्येक नामे होत, यांजवरून आयास, आवयास, आला, आयला, आयाला, आवयाला, आयाकारणें, आवयाकारणे आयासाठीं, आवयासाठीं, आयास्तव, आवयास्तव, आवया विषयीं हे प्रत्यय चतुर्थ्यर्थी होतात, परंतु संस्कृतांत जशीं गंतुं, कर्तुं, तुमुन् प्रत्ययांत अव्ययें असतात तशीं हीं क्रियाविशेषण अव्ययें जाणावीं. उ०, करायास, करावयासाठीं करावयास - गेला इत्यादि.

याच अर्थीं सर्व धातूंचा अंत्यास ऊं निवर्तक होतो परंतु तो एकाक्षरी धातूंचा पुढें प्रत्ययासारखा लागतो. उ०, मला हें काम करूं लाग, करायास लाग, मला जाऊं दे इत्यादि.

कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अधिकरण आणि भाव या अर्थीं तीन लिंगीं आयचा, आयाचा, आवयाचा, आयाची, आयचें हे प्रत्यय होतात. उ०, कर्ता मी एथें असायाचा, कर्म घर बांधावयाचें, करण जेवावयाचा हात, संप्रदान दान द्यावयाचा ब्राह्मण, अधिकरण बसावया

चा घोडा, हीं सर्व विशेषणें होत. भाव-मला एथें असायाचें इत्यादि.

कित्येक धातूं वरून स्वार्थीं स्त्रीलिंगीं णी प्रत्यय होऊन नामें होतात. उ०, मळणी, चाळणी, भांजणी, करणी इत्यादि.

कित्येक धातूंवरून स्वार्थीं स्त्रीलिंगीं णूक प्रत्यय होतो, तदंत नामें होतात; उ०, पाळणूक. गांजणूक, वागणूक इत्यादि.

तत्तत्धात्वर्थाची सिद्धि झाली असा अर्थ विवक्षित असतां तीन लिंगीं क्रमें करून ला, ली, लें हे प्रत्यय होतात; उ०, बांधला वाडा मोडूंनये, गेल्याचें घर, मेल्याची बायको इत्यादि.

कर्त्ता वाच्य असतां सर्व धातूं वरून वर्तमान आणि भविष्य काळीं णारा आणि णार प्रत्यय होतात; उ० वर्तमान काळाचीं. बोलणार फसतो, पोंवणार बुडतो, बोलणारा फसतो; पोंवणारा बुडतो इ०. उदाहरणें भविष्य काळाचीं. तो घर बांधणार आहे इ०. ला, णारा, णार, एतदंत विशेषणे तीन लिंगीं होतात.

कर्त्ता, कर्म, करण, संप्रदान, अधिकरण आणि धात्वर्थ सिद्धि या अर्थी **लेला** प्रत्यय तीन लिंगीं होतो; उ० कर्त्ता- **बसलेला** घोडा अर्थ बसला तो. कर्म-**बांधलेलें** घरअर्थ बांधिलें तें. करण-**बांधलेली** दोरी अर्थ बांधिजेलें जिणे करून ती. संप्रदान-दान **दिलेला** ब्राह्मण, अर्थ दान दिलें जा कारणें तो. अधिकरण- **राहिलेली** जागा ह्मणजे राहिजेतें जीचा ठायीं ती. हीं विशेषणे होत.

अकर्मक धातूंवरून क्वचित् भावीं **लेला** प्रत्यय होतो; उ० **तुह्मी निजलेलें** असावें.

आणखी ही धातूंवरून प्रत्यय होऊन जे धातुसाधित शब्द सिद्ध होतात ते कोष्टकांत लिहिले आहेत त्या प्रत्ययांचे अर्थ, विस्तार भयास्तव लिहिले नाहींत.

| धातु. | प्रत्यय. | रूपें. |
|---|---|---|
| खेळ | आडू | खेळाडू. |
| जळ | आऊ | जळाऊ. |
| तार | ता | तारता. |
| धु | णावळ | धुणावळ. |

| धातु | प्रत्यय | रूपें. |
| --- | --- | --- |
| कढ | त | कढत-पाणी. |
| कोर | ईव | कोरींव. |

इत्यादि अनेक शब्द असे सिद्ध होतात ते या रीतीने आणावे. यांस लिंग, वचन, विभक्ति इतर नामां प्रमाणेच होतात.

कित्येक धातूंचा जा खेळ, मार इत्यादि प्रकृति त्या नामें होतात; उ० त्याणे खेळ मांडला आहे इत्यादि.

धातूंवरून भावीं ले प्रत्यय होतो, त्या लेंतावरून द्वितीयादि विभक्तींचे प्रत्यय लागतात, परंतु तीं क्रिया विशेषण अव्ययें मानावीं; उ० रुपये असल्यास सर्व मिळतें इत्यादि.

## क्रियापद बोधक अव्यय विचार.

क्रियापद बोधक अव्ययें पाहिजे, नको, नये. हावें, इ० आहेत, जांचा विध्यर्थी प्रयोग होतो. उ० मला विद्या पाहिजे, मला द्रव्य हावें, हें तुह्मी काम केलें पाहिजे; तुह्मी निजलें पाहिजे;

तुह्मी स्वकीय कुशळ लिहीत असलें पाहिजे इ०. **तुह्मी काम करावें, तुह्मी निजावें, तुह्मी स्वकीय कुशळ लिहीत असावें.** अशा अर्थाचे हे प्रयोग आहेत; परंतु यांपेक्षां त्या प्रयोगांत प्रार्थनाधिक्य विशेष आहे; **तुह्मी काम केलें पाहिजे,** एथें तुह्मी हीं तृतीया कर्त्रर्थी, काम हीं प्रथमा संबंध्यर्थी, केलें हें करणं या अर्थी नाम प्रथमा कर्त्रर्थी, पाहिजे हें आवश्यकत्वार्थी क्रियापद बोधक अव्यय. शाब्द बोध भवत्कर्तृक काम संबंधी करणे पाहिजे; अकर्म कर्तरि प्रयोग **तुह्मी स्वकीय कुशळ लिहीत असलें पाहिजे,** एथें भवत् कर्तृक स्वकीय कुशळ संबंधी लिहीत ह्मणजे लेखन व्यापार विशिष्टत्वें करून असलें ह्मणजे असणें तें पाहिजे असा शाब्द बोधझाला प्र० अकमर्क. **तुह्मी निजलें पाहिजे,** ह्मणजे तुमचें निजणे आवश्यक आहे असा बोध होतो, प्र० अकमर्क. **हवें, हावें** यांचा प्रयोग प्रायः नामादिकांपुढें होतो.

**नको** हें अव्यय पाहिजे, हावें इत्यादि विध्यर्थांचा निषेधकरितें; उ० तुला अन्न पाहिजे किंवा

पैका पाहिजे? उ० मला अन्न नको पैका नको

इ० मी हें काम करूं? नकोकरू करूंनको, अ० करूं नकोत- नका इत्यादि

नये हेंही अव्यय विध्यर्थाचा निषेध करितें उ० म्याहें काम करावें? उत्तर त्वां करूंनये इत्यादि.

नये याचा येईना याअर्थीं ही प्रयोग होतो. उ० ऐसें नये माझा मना होका पंडीत शाहणा इत्यादि.

पाहिजे याचीं रूपें ए० पाहिजे अ० पाहिजेत द्वि० पु० ए० तूं पाहिजेस.

नको याचीं रूपें, ए० नको अ० नको, नकोत द्वि० ए० तूं नकोस. अ० नका इत्यादि.

## धातु साधित अव्यय विचार.

कालरूप अधिकरण वाच्य असतां आणि त्या काळीं दुसरी क्रिया विवक्षित आहे तर, सर्व धातूंवरून ता आणि ताना हे प्रत्यय होतात. उ० जेवतां जेवताना बोलतो, अर्थ जेवत्ये समयीं.

पूर्व क्रिया असमाप्त असून द्वितीय क्रियेची वि-

पक्षा असतां तां प्रत्यय होतो, आणि तदंतास द्वि॰ त्व होतें, व तें क्रिया विशेषण होतें; उ॰ **जातां जातां** मारीन, **चालतां चालतां** धरीन इत्यादि.

भूत आणि भविष्य या काळांचें क्रियापद पुढें असतां त्याच धातूवरून **तां** आणि **त** पर्यायानें नित्यें होतात, तदंतास द्वित्व होतें, आणि तें क्रिया॰ विशेषण होतें; उ॰ **पढतां पढतां** पढेल **करीत करीत** केलें इत्यादि.

धात्वर्थ निमित्त असतां अस धातूवरून **तां** प्र॰ त्यय होतो; उ॰ **पैका असतां** वस्त्र मिळेल इत्यादि.

धात्वर्थ निषेध पूर्वक कांहीं एक अर्थ सांगाव॰ याचा असतां **तां, ताना** हे प्रत्यय होतात. आ॰ णि धातूचे मागें निषेधार्थक **न** लागतो; उ॰ मी **नजातां नजाताना** काम होणार नाहीं.

दोन क्रियांचा विशेषण विशेष्य भाव, एक क॰ र्ता, एक काळ अशी विवक्षा असतां विशेषण धातू वरून त प्रत्यय होतो; उ॰ **खात** जातो **बो॰**

**लत** जातो इ०. या तांत अव्ययांस द्वित्व ही होतें; उ०, **खात, खात** जातो इत्यादि.

टाक, ठेव, पाड इ० कित्येक धातूंचा योगीं प्रयोज्य प्रयोजक भाव आहे तर धातू पुढें त, प्रत्यय होतो; उ० आंबे **पिकत** घाल, पीठ **भिजत** टाक इत्यादि.

दे घे इ० कित्येक धातूंचा योगीं विक धातूवरून त प्रत्यय होतो; उ० **विकत** घे, **विकत** मिळेल इत्यादि.

नाहीं याचा योगीं क्रियापदाचा अर्थाचा बाध करून वर्तमान काळीं कर्तरि सर्व धातू वरून त प्रत्यय होतो; उ० **बसत** नाहीं, **करीत** नाहीं इत्यादि.

एक कर्तृक दोन क्रियां मध्यें आधींची जे क्रिया तद्वाचक धातूवरून भूतार्थी आणि कार्य कारण भाव असतां, कारण भूत जी क्रिया तद्वाचक धातू वरून **ऊन** प्रत्यय होतो; उ० तो **जेऊन** गेला, **खाऊन** मातला इत्यादि.

चुक, दे, घे इत्यादि कित्येक धातूंचा योगीं

धातूं वरून भावीं ऊन प्रत्यय होतो; उ० बोलून चुकलों इत्यादि.

## नामादिकांचा *विभक्तींचा अर्थ विचार

### प्रथमा.

अकर्मकर्तरि आणि सकर्मकर्तरि प्रयोगीं नामादिकांवरून कर्त्रर्थी आणि कर्मार्थी प्रथमा होत्ये; परंतु कर्मार्थी विकल्पेंकरून होत्ये. कोणतीही कृति करायास स्वतंत्र जो त्यास कर्त्ता ह्मणावें, उ० तो जातो, तो वसतो एथें तो शब्द कर्तृ वाचक आहे ह्मणून याजवरून कर्त्रर्थी प्रथमा झाली. कर्त्याचा व्यापाराचें फळ जावर असतें तें कर्म

*या भाषेंत नामादिकांपुढें जा द्वितीयादि विभक्ति लागतात त्या नामादिकांपुढें हा शब्दाचा योगायांचून न लागत नाहीं. विभक्ति लागल्यानंतर मग नामादिकांपुढें हा शब्द कोठें दिसतो कोठें दिसत नाहीं. उ. तो याला त्याला, तयाला. जोयाला ज्याला जयाला इ. या स्थळीं हा शब्द दिसतो देव याला देयाला. देव याने देवाने इ. स्थळीं दिसत नाहीं. प्राचीन ग्रंथात नामादिकांपुढें हा शब्द लागून त्याला द्वितीयादि विभक्ति लागलेलीं उदाहरणें बहुत आहेत जसें अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची,

होय; उदाहरण, तो वाघ मारितो एथे वाघ श-ब्द कर्म आहे त्याजवरुन कर्मार्थी प्रथमा झाली, पक्षीं कर्म वाचकावरुन द्वितीया होत्ये; उ०, तो वाघास मारितो इ०. प्रथमा विभक्तीस प्रत्यय नाहीं, एकवचनीं शब्दाचें जें अविकृत रूप तीच प्रथमा जाणावी. अनेक वचनीं रूप भेद होतो तो त्या त्या ठिकाणीं दर्शविला आहे.

जा पात्राने मोजावयाचें किंवा जा वजनाने तो-लावयाचें तद्वाचक शब्दांवरून परिमाणार्थी प्रथमा होत्ये. उ० ,शेर गहूं, फरा बाजरी, मण तूप, एक तोळा सोने इ०. हिला परिमाणार्थक प्रथमा ह्मणावी.

## द्वितीया.

कर्म वाचक शब्दांवरून पक्षीं द्वितीया होत्ये. उ०, तो वाघाला मारितो एथे तो या कर्त्याचा व्यापाराचें फळ वाघावर आहे ह्मणून वाघ कर्मवा-चक पद होय याजवरून कर्मणि द्वितीया जाहली. पक्षीं कर्मार्थी प्रथमा होत्ये; उ०, तो वाघ मारि-

तो. फार करून कर्मार्थी प्रथमाच बोलण्यांत येत्ये तशी द्वितीया येत नाहीं; उ०, तो घर बांधितो-शिंवतो- शाकारितो; इत्यादि कित्येक उदाहरणीं प्रथमाच होत्ये.

कर्म वाचकावरून द्वितीया जाहली असतां तिचे प्रत्यय नाहींसे होऊन तत्प्रयुक्त दीर्घ मात्र राहतो. उ०, तो देवा भजतो, गावां गेला, देवळा गेला इत्यादि.

गमनार्थक धातु, कर्म योग असतां सकर्मक आणि कर्माचा योग नसतां अकर्मक जाणावे. जसें तो पुण्याला जातो एथे कर्माचा योग आहे ह्मणून एथे जा धातु सकर्मक आणि रथ जातो एथे कर्माचा योग नाहीं ह्मणून अशा ठिकाणीं हा धातु अकर्मक होतो. गमनार्थक धातु योगीं कर्मास अधिकरण रूपता मानून विकल्पेंकरून सप्तमी ही होत्ये. उ०, तो गावीं जातो, देशीं जातो इ०.

माग, विचार, सांग, दंड, दे, विक इ० द्विकर्मक धातूंचें जें मुख्य कर्म त्या कर्मानें युक्त जें नाम त्यास कर्म ह्मणावें त्याजवरून पक्षीं द्वितीया होत्ये.

उ०, तो राजाप्रत वस्त्रातें मागतो, पक्षीं दुसऱ्या कर्मावरून प्रथमा होत्ये; उ०, राजाप्रत वस्त्र मागतो, शहाण्यास कल्पना विचारितो, पुत्रास श्लोक सांगतो, चोरास शंभर रुपये दंडितो, ब्राह्मणास गाय देतो, तो त्यास घोडा विकितो इत्यादि.

द्वितीयेचे आणि चतुर्थीचे प्रत्यय प्रायशः सारखेच होतात, याजकरितां या दोन विभक्तींचा भेद समजण्याचा प्रकार असा आहे कीं, सकर्मक क्रियापद योगीं नामादिकां पुढें स, ला इत्यादि प्रत्यय असतां द्वितीया जाणावी उ०, तो त्यास मारितो इ०, आणि अकर्मक क्रियापद योगीं नामादिकां पुढें स, ला इ० प्रत्यय असतां प्रतियोगींची द्वितीया किंवा चतुर्थी जाणावी उ०, मला मजप्रत तूप आवडतें, त्याला हें बोलणें साजतें, भोजनास अन्न पाहिजे इत्यादि.

## तृतीया.

कर्तृवाचक आणि करणवाचक शब्दांवरून तृ-

तीया होत्ये. कर्त्याचें लक्षण प्रथमेंत सांगितलें, आतां कर्त्याचा कृतीस उपयोगी जें साधन तें करण होय. कर्त्रर्थीं नामादिकांवरून तृतीयेचा एक वचनीं नें, एं आणि अनेक वचनीं नीं, हीं, ई हे प्रत्यय होतात. उ०, एकवचन, व्याधानें- व्याधें- बाणानें मृग मारिला; अनेकवचन. व्याधांनीं- व्याधाहीं बाणेंकरून मृग मारिला. एथे व्याध मृग मारण्याचा कर्त्ता आहे ह्मणून व्याध शब्दावरून कर्तरि तृतीया झाली. कर्त्याचा मारण्याचा कृतीस उपयोगी साधन बाण आहे ह्मणून बाण शब्दावरून करणीं तृतीया झाली.

कर्वीं, कडून हीं तृतीयार्थक अव्ययें आहेत यांचा प्रयोग प्रयोज्य कर्तरि क्रियापदाशीं होतो; उ०, तो माणसाकडून- माणसाकर्वीं चोरांस बांधवितो या प्रयोगांत माणूस प्रयोज्य कर्त्ता आहे ह्मणून त्याजवरून तृतीया झाली. केरसुणीनें- वारीं- केर झाडितो ही करणीं तृतीया होय.

मारायाचीं आणि खेळायाचीं जीं साधनें तद्वाचक शब्दांवरून करणीं तृतीया होत्ये; पक्षीं कर्मार्थीं

प्रथमा ही होत्ये; उ० काठीने मारितो पक्षीं काठी मारितो, गोट्यानीं खेळतो पक्षीं गोट्या खेळतो इत्यादि.

कोण एक अवयवास विकार झाला असतां तो विकार अवयवीवर बोलण्यांत येतो, तेव्हां अवयव वाचक शब्दांवरून तृतीया होत्ये; उ०, पायांने लंगडा, डोळ्याने तिर्वा इ०. या तृतीयेस अवयव तृतीया ह्मणावें.

अमुकाचें अमुक अवयव स्वभावादि चांगलें अथवा वाईट हा अर्थ अवयवीवर बोलण्यांत येतो तेव्हां अवयव, स्वभाव इत्यादि वाचक शब्दांवरून तृतीयेचा ने प्रत्यय होतो; पक्षीं लिंगत्रयीं तृतीयार्थीं चा, ची, चें हे प्रत्यय होतात. उ०, तो कानाने अथवा कानाचा हलका, तोंडाने अथवा तोंडाचा फटकळ, हाताने अथवा हाताचा उदार, स्वभावाने चांगला, स्वभावाचा चांगला, नावाने जोशी, नावाचा जोशी, जातीने शूर, जातीचा शूर इ०. मानाने थोर, वयाने लहान, विद्येने थोर, पैशाने थोर इ० उदाहरणीं प्रायः चा होत

नाहीं. कानाने हलका इत्यादि स्थळींचा तृतीयेस गुणवाचक तृतीया ह्मणावी.

सादृश्य वाचक शब्दांचा योगीं नामावरून शीं हा तृतीयेचा प्रत्यय होतो, पर्शीं त्याचा समासामुळें लोप होतो. उ०, **वाघाशीं तुल्य** तो **वाघा तुल्य**, **सिंहाशीं सदृश** तो **सिंह सदृश** इत्यादि.

सहार्थक शब्द योगीं नामावरून **शीं** तृतीया होत्ये; उ०, **तो त्याशीं बोलतो** ह्मणजे त्या सह-वर्तमान बोलतो असा अर्थ.

कांहीं एक फल सिद्धीची अथवा कार्याची विवक्षा असतां, कालवाचक आणि नक्षत्र वाचक शब्दांवरून तृतीयेचा ने आणि सप्तमीचे **आंत, मध्यें** क्वचित् **ठायीं, ईं** हे प्रत्यय विकल्पेंकरून होतात; उ०, **घटिकेने** अथवा **घटिकेंत, घटिकेमध्यें** पुस्तक वाचितो, **मूळ नक्षत्राने** किंवा **मूळ नक्षत्रीं** आवाहन करावें, **श्रवणाने** अथवा **श्रवणाचा ठायीं** विसर्जन करावें.

विक, दे, घे, टाळ इत्यादि धातूंचा योगीं मूल्य वाचक शब्दांवरून करणीं तृतीया होत्ये पर्शीं द्वि-

तीया होत्ये; उ०, शंभर रुपयांनी अथवा शंभर रुपयांस हा घोडा विकला- दिला इत्यादि.

मला काम होतें, माझाने काम होतें, एथें मला ही चतुर्थी, आणि माझाने ही तृतीया या दोन ही करणार्थी जाणाव्या. माझाने किंवा मला काम करवतें या प्रयोगांत दोनही विभक्ति कर्त्रर्थी जाणाव्या. हा प्रयोग संस्कृतांत भावीं होतो, परंतु एथे कर्मणि आहे.

माझाने काम केलें जाईल या प्रयोगांत काम कर्त्ता आहे, ह्मणून हा प्रयोग अकर्मक होय, एथे माझाने ही तृतीया करणी जाणावी.

त्याणे अथवा त्याला बसलें पाहिजे, एथे तृतीया आणि चतुर्थी या दोनही विभक्तींचा अर्थ संबंधी किंवा कर्त्ता, तेव्हां तत्संबंधी बसलें ह्मणजे बसणे पाहिजे असा बोध होतो; एथें बसलें हें धातु साधित नाम जाणावें.

त्याणे अथवा त्याला हें काम केलें पाहिजे एथें तृतीया आणि द्वितीया कर्त्रर्थी, काम हीं प्रथमा संबंध्यर्थी, केलें ह्मणजे करणें, पाहिजे हें

क्रियापद बोधक अव्यय, शाब्द बोध तत्कर्तृक काम संबंधि केलें ह्मणजे करणे पाहिजे; प्रयोग अकर्म कर्तरि.

**बसल्याने निजतो, निजल्याने वाचितो-गातो** ह्मणजे बसून निजतो, निजून गातो असा अर्थ; या स्थलीं बसल्याने निजल्याने हीं क्रिया विशेषण अव्ययें जाणावीं.

## चतुर्थी.

प्रयोजन रूप अर्थाची विवक्षा असतां नामावरून चतुर्थी होत्ये; उ०, **भोजनार्थ- भोजनास- ला- कारणे- साठीं** अन्न पाहिजे. कित्येक चतुर्थ्यर्थक अव्ययें पुढें असतां नामावरून स्वार्थी विकल्पें चा होतो; उ०, **भोजनाचासाठीं- भोजनाचाकारणे- भोजनाचा अर्थी** अन्न पाहिजे इत्यादि.

**त्याला जावें लागतें** ह्मणजे तत्कर्तृक किंवा तत्संबंधि जाणे लागतें, अशा स्थळीं त्याला ही कर्तरि अथवा संबंध्यर्थी चतुर्थी जाणावी; एथें जावें

हें धातु साधित नाम मानावें; प्रयोग अकर्मक.

**मला काम करावें लागतें** एथें मला ही कर्त्रर्थी चतुर्थी काम ही संबंध्यर्थी प्रथमा करावें ह्मणजे करणे लागतें. अकर्मक क्रियापद. मत्कर्तृक काम संबंधि जें करणे तें लागतें असा बोध. करावें हें धातु साधित नाम. संप्रदानी चतुर्थीचा निर्वाह द्वितीयेनेच केला आहे.

## पंचमी.

दोन पदार्थांचा वियोगार्थी अवधिभूत शब्दावरून पंचमी होत्ये. उ०, **झाडापासून** पान पडतें. अवधिभूत जो शब्द तो केवळ निर्जीव असल्यास त्याजवरून **हून, ऊन, कडून** हे पंचमीचे प्रत्यय होतात; उ०, **घराहून· घराकडून· घरून** आला.

कित्येक देशवाचक अव्ययांवरून **ऊन** हा पंचमीचा प्रत्यय होतो. उ० **वरून, खालून, मधून** इत्यादि.

रक्षणार्थ धातूचा योगीं भयाचें जें कारण तद्वा·

चक शब्दांवरून **पासून** हा पंचमीचा प्रत्यय होतो. उ० त्याणे त्यास **चोरापासून** रक्षिलें.

कार्य कारण भाव विवक्षा असतां कारण वाचक शब्दांवरून आणि जा कार्याचें जें निमित्त तद्वाचक शब्दांवरून क्वचित् पंचमी क्वचित् तृतीया पर्यायें करून दोनही होतात; उ० **मृत्तिकेपासून** घट होतो, **अजीर्णापासून** अथवा **अजीर्णानें** ज्वर होतो, **शत्रूपासून** पराजय पावतो, **चोरापासून** भितो, एथें पक्षीं चतुर्थी होत्ये. उ० **चोराकारणें**- **चोराला**- **चोरास** भितो इत्यादि.

## षष्ठी.

स्वस्वामि भाव, जन्य जनक भाव, अवयवावयवीभाव, सेव्य सेवकभाव इत्यादि संबंधसामान्याची विवक्षा असतां नामादिकां वरून षष्ठी होत्ये तिचे प्रत्यय चा, ची, चें असे आहेत; उ०, **त्याचा** बाग, तिचा नवरा इ०. जेथे शब्दगत पुंस्त्वादिकांचें भान होऊन विशेष्यगत पुंस्त्वादिकांचें भान होतें तेथें ही षष्ठी मानावी; अन्यत्र

चा, ची, चें हे प्रत्यय विशेष्य लिंगानुसार लाग- तात, त्यापेक्षां तदंतास विशेषण ह्मणावें हें बरें; सं- स्कृतामध्यें तद्धितांत इदमर्थी नामादिकांवरून प्रत्यय होऊन पु० मदीयः, स्त्री० मदीया, न० मदीयं; या- च रीतीनें पु० अस्मदीयः, स्त्री० अस्मदीया, न० अस्मदीयं अशीं विशेषणे होतात त्याजातीचीं या भाषेंतील चांतरूपें विशेषणे आहेत; त्यापेक्षां हीं विशेषणे जाणून तदनुसार व्याकरण करावें हें आ- ह्मास बरें वाटतें; यापक्षीं माझा आणि आमचा हीं दोनही एकवचने मानावीं. आतां आमचा ए- थें चा टाकून जें अनेकवचनाचें भान होतें असेंच संस्कृतांत अस्मदीयः एथेंही अनेकवचन भान हो- तें परंतु याची जशी विवक्षा संस्कृतांत नाहीं तशी- च आमचा एथेंही अनेकवचनाची विवक्षा नाहीं असें मानावें.

## सप्तमी.

कोणएक पदार्थाचें जें अधिकरण त्यावरून स-

मभी होत्ये. उ० सिंहासनीं- सिंहासनाठायीं राजा बसतो.

अंगभूषक किंवा दूषक जे वस्त्र, बिड्या इ० पदार्थ यांचा आणि अंगवाचकांचा आधाराधेय भाव विवक्षित असतां आधेय वाचकावरून सप्तमी होत्ये; उ० जोड्यांतपाय याअर्थी पायांत जोडा, पायांत बिडी, डोकींत पागोटें इ० प्र० होतात.

संबोधनविभक्ति कोणएकास हाकमारणें अशा अर्थी होत्ये तिला प्रत्यय नाहींत; नामाचा मागें किंवा पुढें अरे, अहो, हो इ० अव्ययें लागतात. उ० अरेबाबा, अहोकाका, काकाहो इ० कित्येक शब्दांचा अंत्यास विकार ही होतो. उ० अरेदेवा, अरेघोड्या, अगस्त्रिये, अगकाक्ये इ०.

अव्ययविचार.

अव्यय ह्मणजे जांस लिंग, वचन, विभक्ति लागत नाहींत, असे जे शब्द तीं. त्यांचा जाती चार आहेत. १ क्रियाविशेषण २ उभयान्वयी ३ शब्दयोगी आणि ४ केवळप्रयोगी.

## क्रिया विशेषण अव्यय.

**क्रिया विशेषण अव्यय** ह्मणजे क्रियेवर विशेष दाखविणार जें अव्यय तें होय; जसें, हळू चाल, चांगलें बोल, बरें कर इत्यादि.

फार, अति इत्यादि कित्येक अव्ययें क्रिया विशेषणाचींही विशेषणे होतात. उ०, फार हळू चाल, अति हळू बोल इत्यादि.

कालवाचक, स्थलवाचक, स्वीकारार्थक अनुकरण रूप तशींच पूर्वीं सांगीतलेलीं धातु साधित अव्ययें आणि अव्ययी भाव समास रूप अव्ययें हीं सर्व क्रिया विशेषणे आहेत.

**कालवाचक अव्ययें** जसें आज, उद्यां, काल, परवां, कदाचित्, जेव्हां, तेव्हां, एव्हां, केव्हां इत्यादि.

**स्थलवाचक** जसें, इकडे, तिकडे, जिकडे, खालीं, वर, मध्यें, क्वचित् इत्यादि.

कित्येक **स्वीकारार्थक** खरें, ठीक, बरें इ०.

**अनुकरण रूप** अव्ययें जसें, फट्‌कन, फट्‌कर, फट्‌दिन, फट्‌दिशीं इत्यादि.

कित्येक आकारांत शब्द क्रियाविशेषणे होतात तेव्हां त्यांचीं लिंगें वचने मात्र फिरतात. उ०, त्याला भला पकडला, ती बरी चोरीवर सांपडली; तें पोर बरें सांपडलें, इत्यादि.

## उभयान्वयी अव्यय विचार.

उभयान्वयी अव्यय तेंच होय जें दोन शब्दांस किंवा वाक्यांस परस्पर जोडितें. उ०, हा आणि तो दोघे गांवीं गेले. तो पुण्यास गेला आणि तेथून काशीस गेला इ०. याप्रमाणें व, आणखी इ० अव्ययें जाणावीं. याचे आणखी चार भेद आहेत. **नित्यसंबद्ध उभयान्वयी, न्यूनबोधक उभयान्वयी, पक्षांतर बोधक उभयान्वयी** आणि **कारण बोधक उभयान्वयी.**

**नित्य संबद्ध उभयान्वयी** ह्मणजे परस्पर नित्य संबद्ध असून उभयान्वयी तें उ०, **जर, तर**, असें **जर** तुह्मी आलेत **तर** काम होईल.

**न्यूनबोधक** तेंच होय कीं जें उत्तर भागोपपादन करण्यें समयीं पूर्व भागावर न्यूनता दाखवितें, उ०

तुह्मी शहाणे खरे **परंतु** एथें चुकलां. **परंतु, पण** इ०.

**पक्षांतर बोधक अव्यय** तेंच होय जें दोन पक्षांचा विकल्प दाखवितें. उ० तुह्मी या **अथवा** तुमचा मुलास पाठवा. **अथवा, किंवा, किं** इत्यादि.

**कारण उभयान्वयी** तेंच होय जें पूर्वोत्तर भागांचा कार्य कारण भाव दाखवितें; उ० यामुलास मुलगी द्यावी, **कारण** हा कुलीन विद्वान आहे, **कारण, जर, कांकीं, काय ह्मणून, यास्तव, याजकरितां, यासाठीं** इत्यादि.

## शब्दयोगी अव्यय विचार.

**शब्दयोगी अव्यय** ह्मणजे ज्याचा प्रयोग शब्द योगावांचून होत नाहीं तें जसें, ओटी **वर** बैस, धेनू **पुढें** चारा घाल इ०. याप्रमाणें **आंत, बाहेर, मागें, पूर्वीं, खालीं, खालतीं, वरतीं, नंतर, कडे, शिवाय, वांचून, जवळ, दूर, पासून कारणे** इत्यादि उदाहरणे जाणावीं. प्रायः अव्ययीं भाव समास या अव्ययांशींच होतात; यांतील बहुत करून क्रिया विशेषणें ही होतात. यांचे अर्थ मराठी कोशांत पहावे.

विभक्त्यर्थक आणि संबोधनार्थक अव्ययें शब्द योगी जाणावीं; उ० प्रति, कारणे, साठीं, ठायीं आणि अरे, अहो, अग, अगा इत्यादि.

## केवळ प्रयोगी अव्यय विचार.

**केवळ प्रयोगी** तेंच होय ज्याचा इतर शब्द निरपेक्ष प्रयोग होतो. उ० हां, अहा, अहाहा, छत्, ना, अरेरे, ओहो, अलल, अबबब इ०

## वाक्य योजना.

**वाक्य** ह्मणजे सरलार्थक अनेक पदांचा समुदाय होय, ज्याची समाप्ति क्रियापदानें होत्ये तें; त्याची योजना ह्मणजे तें वाक्य सिद्ध होई अशी शब्दांची रचना. जसें, तो जातो, तो काम करितो इत्यादि.

सर्व वाक्यें **प्रयोग रूप** असतात, त्यांचे प्रयोग आपणांत तीन प्रकारचे आहेत. **कर्तरि, कर्मणि** आणि **भावीं.**

**कर्तरि प्रयोग** तोच होय ज्यांत क्रियापदास कर्त्याचें लिंगवचन असतें. कर्तरि प्रयोगाचे भेद

चार आहेत अकर्मककर्तरि, सकर्मककर्तरि, प्रयोज्यकर्तरि आणि भाव कर्तरि.

अकर्म कर्तरि प्रयोगाची योजना.

प्रथमांत कर्त्ता त्या पुढें अकर्मक क्रियापद. जसें तो बसतो, तो उठतो इत्यादि.

प्रश्न, संभावना इत्यादि कित्येक अर्थीं सर्वत्र क्रियापद मागें ही शोभतें. उ० प्रश्न. जातोस तूं. उत्तर जातों मी. संभावना जाईल तो असें वाटतें. इथें विवक्षावशात् कोठें कर्त्याचा कोठे क्रियापदाचा अध्याहार असतो. उ० प्र० मी जाऊं उ० जा, एथे तूं या कर्त्याचा अध्याहार आहे; व्याकरण ह्मणजे शुद्ध बोलायाची विद्या, एथे आहे या क्रियापदाचा अध्याहार आहे.

अनेक लिंगक अनेक कर्ते असल्यास क्रियापदास शेवटल्या कर्त्याचें लिंग होतें आणि अनेक वचन होतें. उ० बायका, पुरुष आणि मुलें गेलीं पुरुष, मुलें, बायका गेल्या; मुलें, बायका, पुरुष गेले.

जा विशेषणाचीं किंवा सर्व नामाचीं लिंगें फिरा-

वयाजोगीं असतात तीं विशेष्याशीं जेव्हां संबंध ठेवितात तेव्हां त्या विशेष्या प्रमाणे त्यांचीं लिंगव चने फिरतात. उ० हा देखणा मुलगा, ही काळी टोपी, हें काळें लुगडें इत्यादि.

अनेक लिंगक अनेक विशेष्यें जेव्हां प्रयोगांत येतात तेव्हां त्यांचीं विशेषणे आणि सर्व नामे जवळचा विशेष्यांशीं संबंध ठेवितात. उ० त्या गृहस्थांची टोपी, पागोटें, दुपटा पांढरा आहे तीं दुपट्टा, पागोटें, बंडी कोणाची? इत्यादि.

अनेक विशेष्यें असल्यास त्यांचें संबंधि सर्वनाम जवळचा विशेष्याशीं संबंध ठेवितें. उ० सुनारकामाचा उपयोगी जें विंधणें, तासणी, करवती ही त्या वेळेस जवळ असावी.

अनेक कर्तृ नामें भेदक अव्ययाने भिन्न असल्यास क्रियापदास शेवटल्या कर्त्याचें लिंग वचन होतें. उ० तेथें चिखल किंवा रेती असत्ये.

जा वाक्यांत आणि इ० भेदक अव्ययानी संबद्ध तीन पुरुषांचा कर्तृत्वें करून प्रयोग असतो तेथे क्रियापदावरून प्रथम पुरुषाचें अनेक वचन

होतें. उ०, मी तूं आणि तो **जाऊं.** या रीतीनें द्वितीय तृतीय पुरुषाचा जेव्हां प्रयोग आहे तेव्हां द्वितीय पुरुषाचें अनेक वचन क्रियापदास होतें उ० तूं आणि ती दोघें **जा.**

कर्त्याचीं जीं विशेषणे किंवा सर्व नामें तीं कर्त्याचे मागें लागतात. उ०, राजाने **भलता कोणी शहाणा** मनुष्य वाळगावा.

कर्त्यावर विशेषणे किंवा सर्वनामें यांचें विधान कर्तव्य असतां तीं विधेय विशेषणे किंवा सर्वनामें पुढें ही शोभतात उ०, तो मनुष्य **भला** आहे, मी सांगितला तो मनुष्य हा. बहुत विधि विशेषणें आहेत तर तीं पुढेंच असावीं. उ०, तो गृहस्थ **भला, सुशील** आणि **परोपकारी** आहे.

क्रिया विशेषण क्रियापदाचा मागें किंवा पुढें दोन प्रकारचें ही शोभतें. उ०, **हळू** बोल, तो बोलतो **फार.**

अनेक नामे असल्यास त्यांचीं विशेषणें व सर्व नामें यांस अनेक वचन होतें. उ०, तेथें पाटील कुळकरणी महाजन आहेत **ते शाहणे** आहेत.

वाक्यामध्यें पुनरुक्ति न्हावी ह्मणून आणि अलं-कारार्थ विशेषणे व अव्ययें यांचा अध्याहार विवक्षित असतो. उ० मुंबईत मातबर वाणीलोक फार आहेत आणि पारशीही आहेत.

एक जातीय बहुतांचा प्रयोग कर्तव्य असतां क्रियापदास पक्षीं एक वचन होतें. उ०, बहुत लोक मिळाला होता, पक्षीं मिळाले होते; फार मनुष्य मिळालें होतें इत्यादि.

एका वाक्यांत दोन निषेधार्थक अव्ययांचा प्रयोग असतां निषेधाचा उलटा अर्थ होतो. उ०, माझी कांहीं ना नाहीं मी येईन इत्यादि.

## सकर्म कर्तरि प्रयोगाची अन्वय योजना.

सकर्म कर्तरि प्रयोगांत प्रथमांत प्रथम कर्तृवाचक पद मग कर्म वाचक नंतर क्रियापद असा प्रकार आहे. या प्रयोगांत कर्म कोठे द्वितीयांत, कोठे प्रथमांत, कोठे दोन प्रकारचें ही शोभतें. तो देवास भजतो एथें द्वितीयांत, तो काम करितो एथे

प्रथमांत, वाघ **माणसास** खातो, किंवा वाघ **माणु-स** खातो, एथे दोन प्रकारचें ही कर्म शोभतें.

कर्माचीं जीं विशेषणे किंवा सर्व नामें तीं मागें लागतात; आणि त्यांस लिंग, वचन कर्माचेंच होतें इतर सर्व नियम कर्तरि प्रयोगवत् जाणावे.

प्रयोज्य कर्तरि प्रयोगाची योजना सकर्म कर्तरि प्रयोगवत् जाणावी.

भाव-कर्तरि प्रयोगांत कर्त्ता निराळा नसतो क्रि-यापदाचा अर्थ तोच कर्ता असतो. उ०, मला **कळमळतें, मळमळतें** इ०. हीं क्रियापदें नित्यें नपुंसक लिंगीं एक वचनांत असतात.

## कर्मणि प्रयोगाची अन्वय योजना.

कर्मणि प्रयोग स्थलीं कर्ता तृतीयांत आणि क-र्म प्रथमांत असतें, जेव्हां प्रथमांत कर्म आहे तेव्हां पुढील क्रियापदास कर्माचें लिंगवचन होतें. उ०, **त्याणे घोडा बांधिला.** जेव्हां द्वितीयांत कर्म आ-हे तेव्हां क्रियापदास नपुंसकत्व होतें. उ०, **त्याणे घोड्यास बांधिलें** त्याणे घोड्यास बांधिला.

असा ही प्रयोग क्वचित् करितात. अप्राणि वाचक कर्म असल्यास त्यांजवरून प्रायः द्वितीया होत नाहीं.

## भावीं प्रयोगाची अन्वय योजना.

भावीं प्रयोगीं कर्ता तृतीयांत आणि अकर्मक धातूचें क्रियापद असतें; उ०, **म्या रहावें, म्या निजावें** इत्यादि.

या रीतीनें वाक्य योजनां प्रकार संक्षेपानें सांगितला. आतां व्याकरण करण्याची थोडीशी रीति दाखवितों.

## तो भला मुलगा सर्वदा लिहित असतो.

तो तृतीय पुरुष सर्व नामा प्रथमेचें ए० **भला** हें मुलाचें वि०, **मुलगा** हें सिद्ध नाम पुल्लिंगीं प्र० ए०, **सर्वदा** हें काल वाचक क्रिया वि० अव्यय, **लिहित** हें धातु साधित क्रिया वि० अव्यय, **असतो** हें क्रियापद अकर्मक अस धातूचें स्वार्थीं वर्तमान काळीं तृतीय पुरुषाचें ए० अकर्मक कर्तरि

प्रयोग, यांत मुलगा हा कर्त्ता आणि असतो हें क्रियापद.

## त्याणे मुलास पढविलें.

**त्याणे** तो तृतीय पुरुष सर्व नामा पुल्लिंगीं तृ० ए०, **मुलास** मूल सिद्ध नाम पुल्लिंगीं द्वितीयेचें ए०, **पढविलें** पढव प्रयोज्य सकर्मक धातूचें स्वार्थी भूतकाळीं तृयीय पुरुषाचें ए० कर्मणि प्रयोग; त्याणे हा तृतीयांत कर्त्ता मुलास हें द्वितीयांत कर्म पढविलें हें क्रियापद.

## जो मूल विद्याभ्यास करितो त्याजवर सर्व लोक प्रीति ठेवितात.

**जो** संबंधि सर्व नाम, पु० प्र० ए०, **मूल** सिद्ध नाम पु० प्र० ए०, **विद्याभ्यास** समास नाम पु० प्र० ए०, **करितो** सकर्मक कर धातूचें स्वार्थी वर्तमानकाळीं तृ० पु० ए०, सकर्म कर्तरि, प्र०. **त्यावर** त्याचावर त्याजवर अव्ययी भाव समास रूप अव्यय. **सर्व** हें लोकांचें वि०, **लोक** सिद्ध नाम पु० प्र० अ०, **प्रीति** सिद्ध नाम स्त्री०

ए०, ठेवितात सकर्मक ठेव धातूचें स्वार्थी वर्तमान काळीं तृतीय पुरुषाचें अनेकवचन एथे लोक हा कर्त्ता. प्रीती हें कर्म. ठेवितात हें क्रियापद सकर्मकर्त्तरि प्रयोग.

इतिश्री फडकोपाव्ह आपा शास्त्रि
सूरिसूनु गंगाधर शास्त्रि लिखितं
महाराष्ट्र भाषा व्याकरणांतरार्ध स
माप्त श्रीपरमेश्वरार्पण मस्तु.